


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २४४ * नांदेड * शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# जरांगेंना मुंबईत येण्यापासून रोखू शकत नाही -हायकोर्ट

## टीव्हीपुढे बसून बघू नका, आता प्रत्यक्ष अंतरवालीत या! मुंबईचं वेळापत्रक जाहीर करतो, जरांगे पाटलाचं मराठा बांधवांना आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन राज्यातील वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचं गेल्या १४ दिवसापासून अंतरवाली सराटीत आमरण उपोषण सुरु आहे. अद्याप यावर कोणताही तोडगा निघालेला नाही. सगळ्या मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नसल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. तसेच १२ तारखेनंतर मुंबईला जाण्याचा इशारा देखील जरांगे पाटलांनी दिला आहे. अशातच मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील संभाव्य आंदोलनाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. आझाद मैदानात आंदोलनाची परवानगी न देण्याची मागणी करण्यात आली होती. यावर मुंबई उच्च न्यायालयानं महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. मनोज जरांगेंना मुंबईत येण्यापासून रोखू शकत नाही, असा निर्णय उच्च न्यायालयानं दिला आहे. आता यावर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा बांधवांना मोर्चात दाखल होण्याचे आवाहन केले आहे.

जरांगे पाटील यांनी यापूर्वीच मुंबईकडे येणार असल्याचा इशारा दिला होता, तर १२ सप्टेंबरपर्यंतची देण्यात आलेली मुदतही संपुष्टात आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर जरांगे पाटलांची पुढील भूमिका काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आता, जरांगे पाटलांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन मराठा बांधवांना अंतरवालीत येण्याचं आवाहन केलं आहे.

**परवानगी नाही दिली तरी मुंबईला जाणार**

मुंबईत आम्हाला त्रास झाला तर जागोजाग रस्ते अडवून ठेवा, सणावारचे दिवस आहेत, आपला जाण्याचं त्याच वेळेत ठरणार आहे. मागच्या वेळी परवानगी नाकारली, यावेळी ते नाकारणार नाहीत. परवानगी दिली आणि नाही दिली तरी मुंबईला जाणार असा इशाराच जरांगे पाटलांनी दिला.

**क्रॉकोच जनता पार्टीचे अभिजीत दीपके यांनी घेतली जरांगेंची भेट**

मनोज जरांगे यांच्या उपोषणाला १४ दिवस झालेले आहेत, अजूनही सरकारने विचारपूस केलेली नाही. आपल्या राज्यात आणि देशात काय सुरु आहे ते कळत नाही. ज्या लोकांना निवडून दिलं आहे ते लोकांना सोडून सर्वांना भेटतात. मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी सरकार बोलायला तयार नाहीये. मनोज जरांगेंसारख्या समाजसेवकांना मरण्यासाठी सोडून देणार आहे का ? असा सवाल दीपकेंनी केला. क्रॉकोच जनता पार्टीचे अभिजीत दीपके यांनी मनोज जरांगे यांची उपोषणस्थळी जाऊन भेट घेतली. यावेळी ते बोलत होते.

# पुण्यात ४ ट्रक पनीर-खवा जप्त, एफडीएची कारवाई

**पुणे (प्रतिनिधी)–** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. पुण्यातील बुधवार पेठ परिसरातून ४ ट्रक पनीर-खवा जप्त करण्यात आले आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या या ॲक्शनने एकच खळबळ उडाली आहे.

एफडीएच्या पथकाने पुण्यातील बुधवार पेठेत धडक कारवाई करत तब्बल चार ट्रक पनीर आणि खव्याचा साठा जप्त केला आहे. मोठ्या प्रमाणातील हा साठा पाहता कारवाईसाठी अधिकाऱ्यांचा मोठा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला. जप्त केलेल्या खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून, त्यांची गुणवत्ता आणि साठ्याच्या स्त्रोताबाबत तपास सुरू आहे. गणेशोत्सवात मिठाई आणि खाद्यपदार्थांची मागणी वाढत असल्याने भेसळ रोखण्यासाठी एफडीएकडून विशेष मोहीम राबवली जात आहे.

# केंद्र व राज्य सरकार संवेदनाहीन; खासदार संजय राऊतांचा घणाघात

## नांदेडमध्ये 'तुमसे ना हो पायेगा' आंदोलन; दुष्काळ, बेरोजगारीवरून सरकारला धारेवर धरले




**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्र आणि राज्य सरकार दुष्काळ, भूक, बेरोजगारी, उद्योग आणि महागाईसारखे महत्त्वाचे विषय बाजूला सारून नको ती कामे करत आहे. या सरकारला शेतकरी, युवक आणि सामान्य नागरिकांची गरज नाही, हे सरकार संवेदनाहीन आहे, असा घणाघात शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी नांदेड येथे केला.

जिल्हा शिवसेनेच्यावतीने 'तुमसे ना हो पायेगा' या अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी आयोजित धरणे आंदोलनात ते बोलत होते.

यावेळी विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आ. अंबादास दानवे, परभणीचे आमदार राहुल पाटील, उमरग्याचे आमदार प्रवीण स्वामी, संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हाप्रमुख बबन बारसे, भुजंग पाटील, ज्योतिबा खराटे, महानगरप्रमुख प्रकाश मारावार, माजी आमदार अनुसयाताई खेडकर, महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख वत्सला पुयड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना राऊत म्हणाले, देशात आणि राज्यात महत्त्वाचे विषय बाजूला ठेवून हे सरकार जाती-धर्मात भांडणे लावण्याचे काम करत आहे. शेतकऱ्यांना आणि बेरोजगार युवकांना वाऱ्यावर सोडले आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे उपोषणाला बसले असताना सरकारने चर्चेचे दार बंद केले आहे.

राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करणारे एकमेव मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते, मात्र सध्याचे सरकार उद्योगपतींचे ३६ लाख कोटींचे कर्ज माफ करत असल्याचा आरोप त्यांनी केला. राम मंदिराच्या नावाखाली १४०० कोटींची लूट झाल्याचा आणि शिवसेनेचे चिन्ह व पक्ष मिळवण्यासाठी ५५० कोटी रुपये निवडणूक आयोगाला दिल्याचाही आरोप राऊत यांनी केला.

मराठवाडा हा राज्याला दिशा देणारा प्रांत असूनही अविकसित राहिला आहे. दि. १४ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या 'तुमसे ना हो पायेगा' अभियानाच्या समारोपाला उद्धव ठाकरे उपस्थित राहणार असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अंबादास दानवे, राहुल पाटील व इतर नेत्यांनीही मनोगत व्यक्त केले. आंदोलनानंतर शिवसेनेच्या शिष्टमंडळाने मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले.

# नांदेड जिल्ह्यासाठी आज येलो अलर्ट जारी



**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्रांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दि. १२ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्यासह विजांच्या कडकडाटात व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणा तसेच नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी केले आहे.

# नांदेडमध्ये ५६ लाखांची ऑनलाईन फसवणूक

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात ऑनलाईन फसवणूक व खुनाचा प्रयत्न असे दोन गुन्हे वजिराबाद आणि सायबर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दि. १ मार्च २०२५ ते ५ सप्टेंबर २०२६ दरम्यान लईजाई नगरी, नांदेड येथे अज्ञात मोबाईलधारकांनी संगनमत करून फिर्यादी प्रथमेश नारायणराव पावडे (वय २३) यांची फसवणूक केली. आरोपींनी एसव्ही क्रेडिट या ऑनलाईन लोन ॲपच्या माध्यमातून फिर्यादी आणि त्यांच्या मामेबहिणीचे फोटो सोशल मीडियावरून मिळवून मॉर्फ करून अश्लील फोटो तयार केले. ते नातेवाईक व मित्रांना पाठवून धमकावून वेगवेगळ्या बँक खात्यांवर एकूण ५६ लाख ६५ हजार ६० रुपयांची रक्कम वळती करण्यास भाग पाडले.

या प्रकरणी सायबर सेल पोलीस ठाण्यात गु.र.नं. १६/२०२६, कलम ३१८(२), ३१८(४), ३०८(२), ३(५) बीएनएससह कलम ४३, ६६ (डी) (ई) (ए), ६७ माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोलीस निरीक्षक वसंत सप्रे करत आहेत.

**खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल**

दि. १० सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता वजिराबाद परिसरातील नॉव्हेल्टी दुकानासमोर जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपी कार्तिक भगवान भिसे, रा. पंचशील नगर याने फिर्यादी अक्षय लक्ष्मण डुबूकवाड (वय २०, रा. वाघीरोड) याच्यावर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केले. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४६४/२०२६, कलम १०९(१) बीएनएस-२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सपोनि तुरनर करत आहेत.

# डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळा विटंबनेच्या निषेधार्थ सिडकोत बंद

## पोलीस संरक्षण, सीसीटीव्ही आणि आरोपींवर तात्काळ कारवाईची मागणी




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको परिसरातील साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याबाबत घडलेल्या अनुचित घटनेच्या निषेधार्थ लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक संघटना आणि समाजबांधवांनी तीव्र संताप व्यक्त करत जाहीर निषेध नोंदवला.

या पार्श्वभूमीवर सिडको-हडको भागातील व्यापारी व विविध प्रतिष्ठानांनी आपली दुकाने बंद ठेवून आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आंदोलकांनी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना निवेदन देऊन स्मारकास तात्काळ संरक्षण देण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या दरम्यान रस्ता रोको आंदोलन करण्यात आले, तसेच पुतळ्यास दुग्धाभिषेक करून विधिवत पूजन करण्यात आले.

सिडको येथील अण्णाभाऊ साठे स्मारकात नुकतेच साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र, ११ सप्टेंबर रोजी सकाळी पुतळ्याची विटंबना झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर समाजबांधवांनी तात्काळ स्मारक परिसरात धाव घेतली.

या घटनेमुळे मातंग समाज व डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या अनुयायांच्या भावना दुखावल्या आहेत. घटनास्थळी श्वान पथकामार्फत विशेष तपास करण्यात यावा, स्मारकास तात्काळ पोलीस बंदोबस्त देण्यात यावा आणि परिसरात त्वरित सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, अशा मागण्या करण्यात आल्या **(पान ६ वर...)**




# सिताखंडी अपघात : पंतप्रधान मदत निधीतून २ लाख रूपयांची मदत, नरेंद्र मोदींकडून शोक

**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर-बारड राष्ट्रीय महामार्गावरील सिताखंडी घाटात गुरुवारी सायंकाळी ट्रक आणि पिकअप वाहनाची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला असून सात जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघाताबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे.

अपघातातील मृत व्यक्तींच्या निकटवर्तीयांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून (पीएमएनआरएफ) प्रत्येकी २ लाख रुपयांची सानुग्रह मदत मिळण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत मिळण्यासाठी पाठपुरावा करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केले आहे. तर

या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून घटनेची माहिती घेतली. अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना आवश्यक ती शासकीय मदत तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. तसेच जखमींना आवश्यक उपचार व वैद्यकीय सुविधा मिळतील, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

**गोदातीर समाचार**

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# बँकांचा संप: नागरिकांची फरफट

बँक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचा संप झाला की त्याचा सर्वाधिक फटका बसतो तो सर्वसामान्य ग्राहकांना. त्यात शेतकरी, छोटे व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, निवृत्तिवेतनधारक आणि रोजच्या आर्थिक व्यवहारांवर अवलंबून असलेल्या नागरिकांची अक्षरशः कोंडी होते. विशेष म्हणजे यंदाच्या संपानंतर लगेच दुसरा शनिवार आणि त्यानंतर रविवार असल्याने बँकिंग व्यवहार सलग तीन दिवस ठप्प राहण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रश्न एवढाच आहे की, ग्राहकांनी या गैरसोयीची किंमत प्रत्येक वेळी का मोजावी? बँक कर्मचाऱ्यांना आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करण्याचा आणि संपाचा घटनात्मक अधिकार आहे. परंतु अधिकाराबरोबर कर्तव्याची जाणीवही अपेक्षित आहे. बँकिंग व्यवस्था ही केवळ कर्मचाऱ्यांची नोकरी नाही; ती देशाच्या अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहे. शेतकऱ्यांचे पीककर्ज, व्यापाऱ्यांचे व्यवहार, विद्यार्थ्यांच्या फीपासून सामान्य नागरिकांच्या बचतीपर्यंत असंख्य व्यवहार बँकांशी जोडलेले आहेत. त्यामुळे वारंवार संपाचे हत्यार उपसताना त्याचा समाजावर होणारा परिणामही विचारात घेतला पाहिजे. महिन्यातील चार रविवार आणि दोन शनिवार अशा नियमित सुट्ट्या आधीच आहेत. त्यात विविध राष्ट्रीय, प्रादेशिक आणि बँक सुट्ट्या असतात. अशा परिस्थितीत वारंवार संपामुळे प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस आणखी कमी होतात. दुसरीकडे, ग्राहकांना मात्र आपले आर्थिक व्यवहार वेळेत पूर्ण करण्याची सक्ती असते. शेतकऱ्याला कर्जाचा हप्ता, पीककर्जाचे नुतनीकरण, अनुदानाशी संबंधित प्रक्रिया किंवा पैसे काढण्याचे काम असेल, तर बँक बंद असल्यामुळे त्याचे नुकसान कोण भरून काढणार? दुर्दैवाची बाब म्हणजे ग्राहकसेवेबाबतही अनेक बँकांमध्ये समाधानकारक चित्र नाही. बँकेत एखाद्या कामासाठी गेलेल्या ग्राहकाला तासन्‌तास रांगेत उभे राहावे लागते. कर्मचारी उपलब्ध असूनही कामाचा वेग संथ असतो, अशी ग्राहकांची तक्रार असते. काही ठिकाणी बँक बंद होण्याच्या वेळेच्या काही मिनिटे आधी पोहोचलेल्या ग्राहकाला प्रवेश नाकारला जातो. ग्राहकाचा एक मिनिट उशीर चालत नसेल, तर ग्राहकाच्या तासन्‌तास वाया जाणाऱ्या वेळेची जबाबदारी कोण घेणार? रिझर्व बँकेकडून मध्यान्ह जेवणासाठी मध्यंतराची कोणतीही सोय नाही तरीही बँक कर्मचारी, अधिकारी जेवणासाठी म्हणून मध्ये एक तास गायब होतात. आज डिजिटल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग आणि एटीएममुळे व्यवहारांची पद्धत बदलली आहे. तरीही अनेक महत्त्वाच्या सेवा शाखांवरच अवलंबून आहेत. ग्रामीण भागात तर बँक शाखा म्हणजे आर्थिक व्यवस्थेचा आधार असतो. शेतकऱ्यांसाठी हा प्रश्न अधिक गंभीर आहे. डिजिटल सुविधांची उपलब्धता आणि त्यांचा वापर करण्याची क्षमता शहरांइतकी ग्रामीण भागात नाही. त्यामुळे बँक बंद राहणे म्हणजे ग्रामीण ग्राहकांसाठी थेट आर्थिक अडथळा. संप करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मागण्या योग्य आहेत की नाहीत, याचा निर्णय चर्चेने आणि वाटाघाटींनी व्हायला हवा. मात्र दरवर्षी संप हा कायमस्वरूपी उपाय असू शकत नाही. संघटनांनीही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करताना लाखो ग्राहकांना वेठीस धरणे कितपत योग्य आहे? आंदोलनाची इतर प्रभावी आणि ग्राहकांना कमीतकमी त्रास देणारी साधने वापरता येत नाहीत का? काळी फीत लावून काम करता येते. याचवेळी सरकार आणि बँक व्यवस्थापनानेही केवळ संप संपेपर्यंत चर्चा करण्याची पद्धत सोडली पाहिजे. कर्मचारी संघटनांच्या मागण्यांवर वेळेत चर्चा करून प्रश्न प्रलंबित ठेवण्याची संस्कृती संपली पाहिजे. ग्राहकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देणारी स्पष्ट आचारसंहिता आवश्यक आहे. संपाच्या काळातील अनुपस्थितीबाबत 'नो वर्क, नो पे' हे तत्त्व लागू करण्याबाबतही गंभीर चर्चा होणे गरजेचे आहे. काम केले नाही तर त्या दिवसाचा पगार मिळावा का, हा साधा प्रश्न आहे. मात्र वेतनकपात किंवा इन्क्रिमेंट रोखणे यासारख्या शिक्षात्मक उपाययोजना करताना कायदेशीर नियम, सेवा अटी आणि संपाची वैधता यांचा वस्तुनिष्ठ विचार करणे आवश्यक आहे. बँकिंग क्षेत्रातील नोकऱ्या प्रतिष्ठेच्या आणि सुरक्षित मानल्या जातात. त्यामुळे जबाबदारीही तितकीच मोठी आहे. काम करण्याची इच्छा नसलेला कर्मचारी असेल, तर त्याच्या कामगिरीचे मूल्यमापन झाले पाहिजे. ग्राहकसेवा ही उपकाराची बाब नसून बँक कर्मचाऱ्यांच्या नोकरीचा मूलभूत भाग आहे. कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या निष्क्रियता किंवा सततच्या गैरहजेरीला संरक्षण देण्याऐवजी त्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. बँक कर्मचारी आणि अधिकारी हे जनतेच्या पैशातून चालणाऱ्या व्यवस्थेचा भाग आहेत. त्यांना दिला जाणारा पगार हा जनतेच्या पैशातून दिला जातो याचा विसर त्यांना पडलेला आहे. त्यामुळे जनतेच्या अडचणींकडे पाठ फिरवून आंदोलन करण्याची पद्धत कितीही संघटित असली, तरी ती लोकाभिमुख म्हणता येणार नाही. संपाचा अधिकार महत्त्वाचा आहे; पण ग्राहकांचा अधिकार त्याहून कमी नाही. दरवर्षी संप, त्यानंतर सुट्ट्या आणि पुन्हा नेहमीचे कामकाज या चक्रातून ग्राहकांची सुटका कधी होणार? बँकिंग व्यवस्था ग्राहकांसाठी आहे की ग्राहक बँकांसाठी? हा प्रश्न आता ग्राहकांनीच नव्हे, तर बँक व्यवस्थापन, कर्मचारी संघटना आणि सरकारनेही स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

# ब्रिक्सच्या माध्यमातून भारताचा नवा जागतिक अजेंडा



जागतिक राजकारण आणि अर्थकारणाच्या बदलत्या परिस्थितीत ब्रिक्स या संघटनेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. भारताकडे ब्रिक्सचे नेतृत्व असताना 'रिफॉर्म्स, इनोव्हेशन, कोऑपरेशन अँड सस्टेनेबिलिटी' अर्थात सुधारणा, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता या चार प्रमुख आधारस्तंभांवर भारताने आपला अजेंडा पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे भारताची भूमिका केवळ ब्रिक्समधील सदस्य देशाची न राहता विकसनशील आणि उदयोन्मुख राष्ट्रांचा आवाज प्रभावीपणे मांडणाऱ्या देशाची बनत आहे.

ब्रिक्सची सुरुवात ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या चार देशांच्या सहकार्याने झाली. पुढे दक्षिण आफ्रिकेचा समावेश झाला आणि अलीकडील काळात संघटनेचा विस्तारही झाला आहे. जगातील मोठी लोकसंख्या, मोठी बाजारपेठ, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि वाढती आर्थिक क्षमता असलेल्या देशांचा सहभाग ब्रिक्समध्ये असल्याने या संघटनेचे जागतिक महत्त्व मोठे आहे. बदलत्या जागतिक व्यवस्थेत विकसित राष्ट्रांच्या वर्चस्वाला पर्याय निर्माण करण्याच्या दृष्टीनेही ब्रिक्सकडे पाहिले जाते.

आज जग अनेक संकटांच्या वळणावर उभे आहे. युद्धजन्य परिस्थिती, आर्थिक अस्थिरता, व्यापारातील संघर्ष, महागाई, ऊर्जा संकट, हवामानबदल, अन्नसुरक्षा आणि तंत्रज्ञानातील स्पर्धा यामुळे अनेक देशांसमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा वेळी परस्पर सहकार्य, संवाद आणि सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. ब्रिक्स हे त्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरू शकते.

जागतिक संस्थांमध्ये सुधारणा हा भारताच्या अजेंड्याचा महत्त्वाचा भाग आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेसह आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांमध्ये विकसनशील देशांना अधिक प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. जगाची आर्थिक आणि लोकसंख्यात्मक रचना बदलली असताना जुन्या व्यवस्थेत आवश्यक ते बदल होणे गरजेचे आहे. भारताने या सुधारणांसाठी ब्रिक्सच्या माध्यमातून व्यापक सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.

नवोन्मेष आणि तंत्रज्ञान हे भविष्यातील विकासाचे प्रमुख आधार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, आरोग्य, शिक्षण, कृषी, अंतराळ संशोधन आणि नव्या ऊर्जा तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ब्रिक्स देशांनी सहकार्य वाढवले तर त्याचा मोठा फायदा सर्वसामान्य जनतेला होऊ शकतो. भारताने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मिळवलेला अनुभव इतर विकसनशील देशांसाठी उपयुक्त ठरू शकतो. त्याचबरोबर शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षण यांना प्राधान्य देणे काळाची गरज आहे. आर्थिक विकास करताना पर्यावरणाचा समतोल राखणे, स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे, पाण्याचे संवर्धन, अन्नसुरक्षा आणि हवामान बदलाचा सामना करणे आवश्यक आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष न राहता दोन्हींचा समन्वय साधणारे धोरण ब्रिक्सच्या माध्यमातून पुढे नेता येईल.

ब्रिक्स देशांमधील व्यापार आणि आर्थिक सहकार्य वाढवणे हेदेखील महत्त्वाचे आहे. परस्पर व्यापार वाढला, गुंतवणुकीला चालना मिळाली आणि स्थानिक चलनांमध्ये व्यवहार करण्याच्या पर्यायांवर सहकार्य झाले तर जागतिक आर्थिक व्यवस्थेत या देशांचा प्रभाव वाढू शकतो. मात्र यासाठी परस्पर विश्वास, पारदर्शकता आणि संतुलित धोरण आवश्यक आहे.

ब्रिक्ससमोर आव्हानेही कमी नाहीत. सदस्य देशांच्या राजकीय भूमिका, आर्थिक हितसंबंध आणि परराष्ट्र धोरणांमध्ये अनेकदा मतभेद असतात. त्यामुळे सर्व प्रश्नांवर एकमत होणे शक्य नाही. मात्र मतभेद असतानाही सामायिक हिताच्या मुद्द्यांवर सहकार्य करणे हीच ब्रिक्सच्या यशाची खरी कसोटी ठरेल.

भारताने आपल्या नेतृत्वाच्या माध्यमातून ब्रिक्सला केवळ आर्थिक सहकार्याचे व्यासपीठ न ठेवता सुधारणा, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वत विकासाचा प्रभावी जागतिक मंच बनवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विकसनशील देशांच्या समस्या, त्यांच्या आकांक्षा आणि त्यांच्या विकासाचा मुद्दा जागतिक व्यासपीठावर ठामपणे मांडण्याची मोठी संधी भारताला मिळाली आहे. ब्रिक्सच्या माध्यमातून भारताने जगाला संघर्षाऐवजी सहकार्याचा, वर्चस्वाऐवजी समानतेचा आणि अस्थिरतेऐवजी शाश्वत विकासाचा मार्ग दाखवला, तर भारताचे जागतिक नेतृत्व निश्चितच अधिक भक्कम होईल. बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताचा वाढता प्रभाव आणि ब्रिक्सची वाढती व्याप्ती ही देशासाठी निश्चितच आशादायी बाब आहे.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# ...याला नियतीचा खेळ म्हणावे का?

तणाव (Stress) मानवी जीवनातील आज खूप मोठी समस्या होत आहे. त्यामुळे दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या समस्याने मानवी जीवन भयग्रस्त होत आहे. सद्यस्थितीत तर तणाव का आणि कशामुळे निर्माण होईल? हे काहीच सांगता येत नाही. खूप क्षुल्लक कारणावरुन तणावग्रस्त होण्याची स्पर्धाच तरुणाईत निर्माण झालेली आहे. त्यात प्रोढ आणि जेष्ठांचे प्रमाणही वाढत चालले आहे. मानवी जीवनात सुख, दु:ख,आनंद, उदासी,निराशा, वैफल्य देणारे विविध प्रसंग येणार हे निश्चित. आपल्या अपेक्षेप्रमाणे सर्व घटना घडतील. तर ते मानवी जीवन कसे? शिवाय आपल्या जीवनात येणारा भविष्य काळातील प्रत्येक क्षण आपला गुलाम नाही. त्यामुळेच भूतकाळातील सर्व घटना विषयी सांगणे शक्य आहे. (अर्थात स्मरणशक्ती उत्तम असेल तर?) वर्तमानकाळ आपण जगतोच.पण भविष्यकाळा विषयी काय सांगावे ? जेंव्हा जगभरातील ज्योतिषी दुबईला एकत्र आले. परिषदेत वैदिक ज्योतिष,प्राचिन ज्ञान आणि भविष्यातील तंत्रज्ञान यावर सखोल चर्चा झाली.आता मानवी जीवन परिपूर्ण करण्यासाठी, भविष्यात येणाऱ्या कोणत्याही संकटापासून प्रत्येक मनुष्याला सावध करण्यासाठी, प्रत्येकाच्या जीवनात येणाऱ्या आनंदाच्या सुखाच्या क्षणाची,त्यांना माहिती देण्यासाठी आपण देवदूत बनून सर्वत्र भ्रमंती करण्यास पात्र झालो आहे. अशा अविर्भावात ही सर्व मंडळी आपल्या मायदेशी परतणार होती. जिथे जाऊ तिथे लोक आमची वाणी ऐकून तृप्त होणार.आम्हाला भरभरुन देणार, आपला खिसा खाली करणार, आमचा मात्र भरभरुन भरणार आणि आम्हाला देव समजून आमचे दर्शन घेणार. अशा कल्पना मनोराज्यात संचार करुन स्वप्न पहाणारे हे जागतिक पातळीवरचे ज्योतिष महाशय, त्यांच्या समोर बातमी येवून थडकते.' इराण, अमेरिका युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबईच्या विमानतळाजवळ असलेल्या अमेरिकन छावणीजवळ भिषन बॉम्बहल्ला झाला आहे. त्यामुळे विमानसेवा ठप्प झाली आहे. ' या भविष्यकाराचे ज्ञान,हस्तरेषा आणि चेहरा पाहुन होणारे आकलन याचा त्यांना स्वत:चे भविष्य पहाण्यासाठी उपयोग करुन का घेता आला नाही ? त्यांना तिथुन बाहेर पडण्यासाठी तरी तो होणार होता का? नसेल तर त्या सर्व ज्ञानाचे आणि त्यांच्या त्या अगाध ज्ञानाला नेमके काय म्हणावे? हे पिढ्यानपिढ्या पासून चालले तरी काय? असे अनेक प्रश्न संतोषरावच्या मनात निर्माण होतं होते. त्या सर्व प्रश्नानी ते चिंतित होत होते. त्यासोबतच या सर्व विसंगत प्रसंगाचे त्यांना आश्चर्य सुद्धा वाटत होते.

तेवढ्यात त्यांच्या मोबाईलची रिंग वाजली. त्यांच्या मेहुण्यांशी संवाद सुरु झाला. संतोषराव आपल्याला ताबडतोब पुण्याला निघावं लागते. प्रकाशराव बोलत होते. प्रसन्नला थोडं लागलं आहे . दवाखान्यात भरती केलंय. आम्ही चौघं वाशिमवरुन आमच्या गाडीत निघालो. तुम्ही तुमच्या गाडीसाठी ड्रायव्हर ठरवा. संतोषीला काही सांगू नका. आम्ही रात्री दहापर्यंत पोहचतो



संतोषरावच्या मनात कापरं भरलं, भितीचं काहुर उठलं,काळजाचे ठोके वाढले. नक्कीचं काहीतरी अपनेक्षित घटना आहे.मनाला पूर्ण साक्ष पटत होती.तरी सुद्धा व्यक्त होता येत नव्हतं. मनाची उल्घाल आणि डोक्यात ताण तणाव वाढत चालला होता. तरी सुद्धा, तुम्ही या आम्ही तयारी करतो. एवढं बोलून त्यांनी मोबाईल ठेवला. आपल्या अर्धांगिनी संतोषीबाईला त्यांनी आलेल्या फोनची कल्पना दिली.

लगेच कशासाठी निघायचं , का निघायचं ? संतोषी बाईंनी प्रश्नाची सरबत्ती सुरु केली. खरं म्हणजे स्पष्टपणे संतोषरांवाना काहिच माहित नव्हतं. त्यांच्याही मनात प्रश्नाचं मोहोळ उठलेलं असतांना त्यांना प्रकाशला प्रतिप्रश्न करायचे नव्हते. जे असेलं ते तिथे गेल्यावर सर्व काही कळेलच. त्यामुळे आत निर्माण झालेल्या वणव्याची दाहकता बाहेर जाणवू द्यायची नाही. हा त्यांचा निर्धार पक्का होता. संतोषीबाईंनी तात्काळ आपल्या भावाला फोन लावला. उत्तर तेच मिळाले, प्रसन्नला थोडे लागले आहे. आपल्याला लगेच निघायचे आहे. तुमच्या गाडीसाठी ड्रायव्हर ठरवा.

संतोषरावांनी आपल्या मोबाईलवरील ड्रायव्हरचे नंबर काढून बोलायला सुरुवात केली. त्यापैकी काही प्रवासात होते,तर काहिंची रात्री येण्याची तयारी नाही. या आशयाचा संवाद जवळजवळ एक तास चालला. शेवटी एकाने होकार दिला,पण दोन हजार घेईलं म्हणाला. पैशाचा विचार करुन चालणार नव्हतेच. तो यायला तयार झाला हेच त्यांच्यासाठी खूप महत्वाचे. ते मनाशीच हरखून गेले. एवढ्या उदास अवस्थेत त्यांच्या मनावर संतोषाचा शिडकावा मिळाला . त्यासोबतच एका मोठ्या दु:खाची चाहुल सुद्धा लागली होती. पण तिथपर्यंत पोहचण्याची व्यवस्था तर झाली. हेही नसे थोडके! तेवढ्यात वाशिम वरुन चौघे जण संतोषरावकडे येऊन पोहचले. दरम्यानच्या काळात संतोषरावनी ठरवलेला ड्रायव्हर सुद्धा आला आणि रात्री दहा वाजता प्रवास सुरु झाला. तो दिवस गजानन महाराज प्रगट दिन होता. विदर्भात तर हा दिवस मोठ्या भक्तीभावानं साजरा केला जातो. संतोषीबाई तर संत गजानन महाराजांच्या निस्सीम भक्त. महाराजांच्या दर्शनासाठी मेहकर ते शेगाव ह्या फेऱ्या त्यांच्या वर्षाकाठी किती होत असतीलं? हे् नक्की त्यांनाही सांगता येणार नाही. मग अचानक असा प्रवास का सुरु व्हावा?

समृद्धी महामार्गाने प्रवास सुरु झाला. संभाजीनगरला पोहचल्यावर दोन्ही वाहनचालकांना चहाची आवश्यक्ता होती. त्याप्रमाणे चहापाणी झाले. संतोषरावांनी बिल देण्याचा प्रयत्न केला. प्रकाशनी त्यांना ते देवू दिले नाही. त्यावेळेस संतोषराव त्याच्या डोळ्यात पहात होते. त्याच्या डोळ्यात अश्रूधारा मावत नव्हत्या. संतोषरावला बऱ्याच प्रमाणात कल्पना येऊन गेली. पण कोणताही प्रश्न विचारायचा नाही. हा ठाम निश्चय त्यांनी केला होता. तेवढ्यात संतोषरावचे लहान साडू रघुनाथ, ड्रायव्हरजवळ येवून हळूच त्याच्या कानात म्हणाले. गाडी खोपोलीला (जि. रायगड) घ्या. एवढेच बोलून ते त्यांच्या गाडीत जाऊन बसले.

ड्रायव्हरचे प्रश्न संतोषरावांना सुरु झाले. पहिले तं मले पुण्यालं जायचं म्हणाले होते.मंग आता इथं आल्यावर खोपोलीले चला कसं काय म्हणता? या त्याच्या प्रश्नाचं उत्तर संतोषरावकडे नव्हतं. कारण त्यांनाही घरुन निघतांना हे माहित नव्हतं. त्याचे समाधान करण्यासाठी ते म्हणाले, तू फक्त समोरच्या गाडीमागे चालवं. कुठे जायचं ते मलाही काहिच माहितं नाही. परत त्याचा प्रश्न, लग्नाला जायचं का? आता मात्र संतोषराव जरा वैतागले आणि म्हणाले, तुला काय करायचं ? तू फक्त समोरच्या गाडीमागे गाडी चालवं. त्यांच्या मनात एकाच वेळी अनेक विचार,शंका,भिती आणि त्यामुळे येणाऱ्या प्रचंड अस्वस्थेने त्यांना खूप असुरक्षित वाटत होतं. आपल्या सौ. च्या चेहऱ्याकडे पहाण्याची हिम्मत ते करु शकत नव्हते. लोणावळ्याला एका सिलेब्रेशन निमित्ताने त्यांचे पुणे आणि मुंबईचे तरुण फळीतले काही नातेवाईक आले होते. त्यांची मुलगी सौ. धनश्री आणि जावाई धनंजय सुद्धा आले होते. त्या सर्वांच्या सोबत त्यांचा मुलगा प्रसन्न आला होता. तो पुण्यातच शिकत होता. स्पर्धात्मक परिक्षेची तयारी करुन अधिकारी व्हायचं त्याच स्वप्न होतं. एम. ए. अर्थशास्त्र प्रथम श्रेणीचे उत्तम गुण घेऊन त्याने पूर्ण केलं होतं.

हाताशी बि. एड. असू दे. सर्व स्पर्धात्मक परिक्षेत सुरु असलेली जीवघेणी स्पर्धा. कधी यश मिळेलं हे सांगता येत नाही. हा वडिलांचा सल्ला मान्य करुन शिक्षणशास्त्रातील पदवी आपण घेतली पाहिजे. हे त्यालाही पटलं. शिक्षणशास्त्रातील सूक्ष्म अध्यापन, तत्वज्ञान,मानसशास्त्र हे त्याच्या खूप आवडीचे विषय झाले होते. पप्पा शिक्षणशास्त्राचे हे प्रशिक्षण मानसाला किती घडवते. माझ्यासाठी हे खूप आनंददायी शिक्षण आहे. मी एका शाळेत शिकवण्यासाठी जातो. तिथेच मला नौकरी मिळण्याची शक्यता आहे. पुढे मी नेट,सेट आणि पीएच डी. सुद्धा करणार आहे. मला बी एड ने एक नवा उत्साह दिला आहे. असा प्रसन्न करणारा प्रसन्नचा फोन संतोषरावांना त्या दिवशी सकाळीच आला होता.आणि सायंकाळी कोणती वार्ता? चला तिथे गेल्यावर कळेलच. असा विचार करुन त्यांनी एक दीर्घ सुस्कारा टाकला. ते आणि संतोषीबाई घरुन निघाल्या पासून प्रसन्न,धनश्री, धनंजय सर्वांना परत परत फोन लावत होते . रिंगटोन वाजत होत्या.पण कोणीच फोन उचलत नव्हते. हतबल माणसे शेवटी करणार काय? अस्वस्थ मनातले दंद्व कुणाला सांगणार होते? संयम ठेऊन प्रतिक्षा करणे एवढेच हाती होते.

चिंताग्रस्त अवस्थेत भर पडत चालली होती. प्रसन्नचा चेहरा त्यांच्या डोळ्यासमोर आला. वय वर्षे सव्वीस,उंची पाच फुट अकरा इंच,भरदार शरीरयष्टी, सदैव प्रसन्न, आकर्षक चेहरा, रुंद कपाळ , प्रत्येकाशी आदराने बोलण्याचा शिष्टाचार, समज आल्यापासून कोणाशी कधी भांडण तंटा करण्यासाठी वेळच नाही. कोणाच्याही मदतीला धावून जाण्याची वृत्ती, अभ्यास करायला बसल्यावर वेळेचे भान नाही. बोलायला लागल्यावर त्याच्या जिभेवर सरस्वतीच नृत्य करत असे. त्याने अभ्यासलेल्या कोणत्याही विषयावर अत्यंत आत्मविश्वासाने बोलण्यात त्याला मिळणारा आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवायचा. ऐकणारा अगदी त्याचे शिष्यत्व स्विकारुन नम्र श्रोता बनायचा. अभिनयाचे उत्तम अंग, नकला करण्याची भारी हौस. प्रसन्न या नावाचं त्यानं खरच सार्थक केलं होतं. पुणे मुंबई रोडला गाडी लागल्यावर एका ठिकाणी गाडी थांबल्यावर ड्रायवरला बाजुला नेऊन , आता कोणतेही प्रश्न विचाराचे नाही. अशी ताकीद संतोषरावांनी त्याला दिली. वाहनांची चिक्कार गर्दी पार करत शेवटी त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता खोपोली गाठले. जवळपास एका क्षणाचीही झोप न घेता झालेला प्रवास सर्वांगाला वेदना देत होता. बळेच उसना उत्साह दाखऊन पुढच्या क्षणी काय ऐकायला मिळणार? याची प्रतिक्षा करणे एवढेच हाती होते.

एका निवासी हॉटेलवर सर्व पाहुणे त्यांचीच प्रतिक्षा करत होते. सर्वांचे चेहरे थकून गेलेले,चिंताग्रस्त आणि भयग्रस्त! या तुम्ही अगोदर फ्रेश व्हा. एकजण म्हणाला. संतोषराव संतोषीबाई सोबतचे सर्वजण फ्रेश झाल्यावर निवांत बसवून ऐकवण्याचा प्रयत्न होत होता. पण संतोषीबाई आता स्वस्थ राहणे शक्य नव्हते. माझं लेकरु कुठं आहे मला दाखवा... अशी आर्त हाक देऊन त्या माऊलीने हंबरडा फोडला. अनेक प्रश्नाचा भडीमार तिने सुरु केला. तीची समज कशी काढावी? कोणालाच कळत नव्हते? संतोषीबाईला बाजुला घेऊन त्यांची मोठी बहिण सविताने तिला समज दिली.दरम्यान काळात लोणावळ्याला एका टेकडीवरुन उतरतांना प्रसन्नचा पाय घसरला. सुरवातीला त्याच्या डोक्याला आणि डोळ्याला मार लागल्यामुळे तो स्वतःला सावरु शकला नाही. त्याचा देह ठेचत पन्नास साठ फुट खाली आला. त्यावेळी त्याचा एक मधुकर नावाचा मावसभाऊ सोबत होता. त्याने सर्वांना ही बातमी सांगितली. अंम्बुलंस,दवाखाना सर्व शर्थीचे प्रयत्न झाले,पण प्रसन्नची प्राणज्योत मालवली होती.

**–प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# वसा आणि वारसा...

कोणत्याही क्षेत्रातील दिग्गज आणि उत्तुंग व्यक्तिमत्व असणाऱ्या व्यक्तीने कोणत्या तरी महान व्यक्तिमत्त्वाचा वसा घेतलेला असतो. हा वसा सहज मिळालेल्या प्रेरणेतून मिळत असतो. कळत-नकळत आपल्याला रस असणाऱ्या कलेचा, प्रतिभेचा, कार्याचा वसा प्रत्येक माणसाला कुणाकडून तरी मिळतच असतो. ज्यावेळी आपल्या आवडीच्या क्षेत्रात, आवडीच्या कामात उत्तुंग यश प्राप्त करणारी व्यक्ती आपल्या सानिध्यात येते. त्या व्यक्तीचे कार्य आपल्याला प्रेरित करते. तशा स्वरूपाचे कार्य करण्याची आपल्याही मनाची मनस्वी इच्छा तयार होते. माणूस या प्रेरणेतून काहीतरी नाविन्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्य करण्याचे मनावर घेतो. त्या दृष्टीने स्वतःला तयार करतो. त्या संदर्भाने अभ्यास करतो. वेगवेगळ्या माध्यमातून, वेगवेगळ्या मार्गाने ज्ञान मिळवतो आणि प्रत्यक्ष कार्य करायला सुरुवात करतो. भविष्यात प्रयत्न करून त्या क्षेत्रात, त्या कार्यात आपल्या कार्याचा आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा निर्माण करतो. आपली एक आगळीवेगळी ओळख निर्माण करतो. यालाच वसा घेणे असे म्हणतात.

कृषी, उद्योग, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्र यासारख्या सर्वच क्षेत्रात नावारूपाला आलेल्या आणि आपली स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण ओळख निर्माण केलेल्या व्यक्तिमत्त्वांनी कोणत्यातरी व्यक्तिमत्त्वाचा वारसा घेऊनच आपली यशस्वी वाटचाल सुरू केलेली असते. आणि यशाची दैदीप्यमान शिखरे सर केलेली असतात. अशाप्रकारे मिळणारा वसा हा मुख्यत्वे आपल्या कुटुंबातून, आपल्या गुरूकडून, आपल्या आदर्श व्यक्तीकडून, आपल्या परिसरातील उत्तुंग व्यक्तीकडून मिळत असतो.

शक्यतो आपल्या आदर्शांचा आपल्या कुटुंबीयांचा आणि विशेषतः आपल्या गुरुजनांचा वसा पुढे चालवण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्तीकडून होत असतो.

गुरुने दिला ज्ञानरूपी वसा
यापुढे चालवू आम्ही वारसा....

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात ज्ञानाचा, विद्येचा, कलेचा वसा हा आपल्या गुरु कडून मिळत असतो. म्हणून कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होणाऱ्या माणसाच्या जीवनात त्या व्यक्तीच्या गुरुला अनन्यसाधारण महत्त्व असते. ऐतिहासिक काळापासून वसा घेऊन मोठी झालेली माणसे आपण पाहिलेली आहेत.



धनुर्विद्या पारंगत असणाऱ्या पार्थ अर्जुनाने धनुर्विद्येचा वसा आपले गुरु द्रोणाचार्य कडून घेतला. गदायुद्धामध्ये पारंगत असणाऱ्या भिमाने गदा या शस्त्रामध्ये पारंगत असण्याचा वसा श्रीकृष्णाचे भाऊ बलराम यांच्याकडून घेतला. दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकर याने फलंदाजीमध्ये पारंगत होण्यासाठी या कौशल्याचा त्यांच्या गुरु कडून घेतला. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, व्यावसायिक, औद्योगिक, साहित्यिक यासारख्या सर्व क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्तींनी त्यांच्या जवळील कौशल्याचा कलेचा आणि प्रतिभेचा वसा कोणाकडून तरी घेतलेलाच असतो. या पौराणिक काळातील उदाहरणापासून ते आज पर्यंतच्या उदाहरणाने हेच सिद्ध होते की, म णसे प्रेरित होऊन एखाद्या कार्याचा वसा घेतात आणि ध्येयवेडेपणाने त्या क्षेत्रात यश मिळवतात.

ज्ञान कौशल्य कलेचा
वसा माणसे घेतात
कष्ट करून अमाप
अंती यशस्वी होतात...
कृषी उद्योग व्यापार
राजकीय असो क्षेत्र
सामाजिक अध्यात्मिक
वसा चालतो पवित्र...
वसा घेती प्रेरणेचा
झिजविती तन-मन
नित्य अभ्यास करून
वाढविती कलागुण...
रस रुचीच्या क्षेत्रात
कार्य चाले वैशिष्ट्याने
साध्य करूनी यशाला
ठसा पडो नाविण्याने...

अशा पद्धतीने माणसे आपल्या रूचीच्या, आवडीच्या क्षेत्रात आपल्याला प्रेरित करणाऱ्या माणसाकडून कळत-नकळत वसा घेतात. भविष्यात या घेतलेल्या वसाच्या प्रेरणेने अभ्यास करतात, कष्ट करतात, मेहनत करतात. त्याच क्षेत्रात आगळेवेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्य करून दाखवतात. आपली वैशिष्ट्य आपले वेगळेपण सिद्ध करतात. आपली अस्तित्व निर्माण करतात. मग अशा यशस्वी झालेल्या दिग्गज आणि उत्तुंग व्यक्तीचा आणि त्याच्या कार्याचा वारसा पुढे चालू राहण्यासाठी अशा यशस्वी व्यक्तीला आपला एखादा शिष्य तयार करावा लागतो. जेणेकरून आपल्या कार्याचा, विचाराचा आणि यशाच्या वारसा पुढे तेवढ्याच प्रगल्भतेने सुरू राहिला पाहिजे. त्या शिष्यालाही यशस्वी माणसाकडून हा वसा मिळत असतो आणि त्याने पुढे तो वारसा चालवायचा असतो. अशाप्रकारे वसा आणि वारसा ह्या एकमेकांशी अत्यंत संबंधित संकल्पना आहेत. वसा आणि वारसा ह्या संकल्पना पूर्णपणे एकमेकांवर अवलंबून आहेत.

वसा घेऊन जीवनी
साध्य करावे अस्तित्व
याचमुळे माणसाचे
फुलतसे व्यक्तिमत्व.....
बहरल्या व्यक्तित्वाचे
छान आचार विचार
हाच वारसा चांगला
राहो चालू निरंतर.....

**–मयुर जोशी**
विठ्ठल रुक्मिणी नगर,
जिंतूर, जि. परभणी
मो. ९७६७७३३५६०

# प्रतीक्षेनंतर पाच पालकांना मिळाले हक्काचे बालक

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मान्यतेने नात्यांतर्गत व सावत्र दत्तक प्रकरणांना अंतिम आदेश



**नांदेड (प्रतिनिधी)**–आई-वडील होण्याची इच्छा मनाशी बाळगून दत्तक प्रक्रियेची प्रतीक्षा करणाऱ्या पालकांची अखेर प्रतीक्षा संपली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मान्यतेने नात्यांतर्गत व सावत्र दत्तक प्रक्रियेतील पाच प्रकरणांना एकाच दिवशी अंतिम मंजुरी देण्यात आली. त्यामुळे संबंधित पालकांना कायदेशीर प्रक्रियेतून हक्काचे बालक, तर बालकांना हक्काचे व सुरक्षित कुटुंब मिळाले आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी गणेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत या पाचही प्रकरणांची आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. दत्तक घेऊ इच्छिणाऱ्या पालकांची प्रथम सीएआरए संकेतस्थळावर नोंदणी करण्यात आली. त्यानंतर जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत गृहचौकशी करून प्रकरणे बाल कल्याण समितीसमोर सादर करण्यात आली. समितीची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

सीएआरए मार्गदर्शिका, २०२२ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित प्रकरणांना सीएआरए मार्फत ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले. त्यानंतर अंतिम आदेशासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या कक्षात सुनावणी घेण्यात आली. बालकांचे सर्वोत्तम हित या तत्त्वाला प्राधान्य देत सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यानंतर बालकांना त्यांच्या दत्तक पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. तसेच दत्तक विधानाचा अंतिम आदेश पारित करण्यात आला.

दि. ४ मे २०२६ पासून जिल्हाधिकाऱ्यांना दत्तक प्रक्रिया पूर्ण करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यानुसार संबंधित प्रकरणांमध्ये दत्तक आदेशाची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. बालकांचे सुरक्षित व कुटुंबाधारित पुनर्वसन सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने ही कार्यवाही महत्त्वपूर्ण ठरली आहे. महिला व बाल विकास विभागाच्या सक्रिय सहभागातून राज्यभर दत्तक प्रक्रियेला गती देण्यात येत असून, बालकांना सुरक्षित कुटुंब मिळवून देण्याच्या या प्रक्रियेत महाराष्ट्र देशात अग्रेसर ठरत आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दत्तक पालकांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. विधी सल्लागार ॲड. आनंद माळाकोळीकर यांच्या कायदेशीर मार्गदर्शनानुसार संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यात आली. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे, बाल संरक्षण अधिकारी संदीप फुले आणि बाल विकास शाखेचे परिवीक्षा अधिकारी गजानन जिंदमवार यांनी या प्रक्रियेसाठी सहकार्य केले.

## मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा २० रोजी सत्कार

**नांदेड(प्रतिनिधी)**–मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व ३३ कक्षांच्या संयुक्त विद्यमाने मराठा समाजातील प्रज्ञावंत व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा रविवार, दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता शहरातील कै. डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे पार पडणार आहे.

या सोहळ्यात स्पर्धा परीक्षा यूपीएससी, एमपीएससी, आयआटी, ॲडव्हान्स, एनआयटीला प्रवेश मिळवलेले विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षेद्वारे अधिकारी पदावर निवड झालेल्यांचा सत्कार करण्यात येईल. याशिवाय नीट, एमएचसीईटीद्वारे एमबीबीएस,आयुर्वेदिक, एमडी साठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी; इयत्ता चौथी व सातवी स्कॉलरशिपधारक; नवोदय प्रवेशित विद्यार्थी; तसेच इयत्ता १० वीत ८०% आणि १२ वीत ७५% किंवा त्याहून अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी आपली गुणपत्रके व आवश्यक कागदपत्रे प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाच्या नावासह दि. १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत खालील ठिकाणी जमा करावीत. त्यानंतर आलेली कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. मराठा विद्यार्थी वसतिगृह/मराठा सेवा संघ कार्यालय: नवा मोंढा, नांदेड, शिवार पुस्तकालय: वर्कशॉप, (पंडितराव कदम चिखलीकर). खेडकर स्पोर्ट्स: तरोडा रोड, ग्लोबल हॉस्पिटलजवळ, नांदेड येथे संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महसूल मंडळ स्तरावर नाळेश्वर येथे कुणबी प्रमाणपत्रासाठी विशेष शिबीर उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– महसूल मंडळ स्तरावर नाळेश्वर येथे कुणबी प्रमाणपत्र वाटपासाठी विशेश शिबीर घेण्यात आले. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




कुणबी प्रमाणपत्र अधिक सुलभ, गतिमान व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने तहसील कार्यालय नांदेडच्यावतीने मंडळ नाळेश्वर येथे कुणबी प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामुळे परिसरातील नागरिकांना सुलभरितीने कुणबी प्रमाणपत्राविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ आणि प्रभारी तहसीलदार स्वप्नील दिगलवार यांच्या निर्देशानुसार हे विशेष शिबीर घेण्यात आले. कुणबी प्रमाणपत्रासाठी पात्र असलेल्या नागरिकांना त्यांच्या गावाजवळच अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, अभिलेखांची उपलब्धता, कागदपत्रांची पूर्तता तसेच प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा शिबीर घेण्यामागचा हेतू होता.

महसूल मंडळ नाळेश्वर अंतर्गत गावातील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात संबंधित नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून आपल्या प्रकरणांबाबत माहिती घेतली. नागरिकांच्या कागदपत्रांची प्राथमिक तपासणी करून आवश्यक त्या त्रुटी व पूर्ततेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना तहसील कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता कमी होऊन गावपातळीवरच शासकीय सेवेचा लाभ मिळण्यास मदत झाली.

शिबिरादरम्यान नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक असणाऱ्या विविध अभिलेखांची व कागदपत्रांची माहिती देण्यात आली. तसेच उपलब्ध महसुली अभिलेखांच्या आधारे पुढील कार्यवाहीबाबतही संबंधितांना मार्गदर्शन करण्यात आले. पात्र नागरिकांची प्रकरणे नियमानुसार व उपलब्ध पुराव्यांच्या आधारे कार्यवाहीस घेण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

सदर शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी मधुकर फुलवळे, तसेच ग्राम महसूल अधिकारी राजेश बरोडा, अंकुर सकवान, गजानन होळगे, योगेश गोंड, मारुती कदम व मंडळातील ग्रामसेवक व कृषी सहायक, माजी सरपंच, पोलीस पाटील व मंडळांतर्गत सर्व गावातील नागरिक उपस्थित होते.

स्थानिक पातळीवर अशा प्रकारची विशेष शिबिरे आयोजित केल्याबद्दल नागरिकांनी प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवींबद्दल आक्षेपार्ह पोस्ट प्रकरण: चौकशीची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**–पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर अत्यंत आक्षेपार्ह टिप्पणी करणाऱ्या आरोपीची सखोल चौकशी करून त्याच्यावर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी सकल धनगर समाजाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.

नवनाथ लालू सोमासे (रा. कासराळी, ता. बिलोली) याने सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याने धनगर समाजासह सर्व अहिल्याप्रेमींच्या भावना तीव्र दुखावल्या आहेत. या प्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

केवळ आरोपीला अटक करून हे प्रकरण थांबू नये. या कृत्यामागे कोणाचा हात आहे का? आरोपीला कोणी प्रवृत्त केले का? याची सखोल चौकशी करण्यात यावी. आरोपीचा मोबाईल, सोशल मीडिया खाते, पोस्टचा मूळ स्रोत आणि कॉल डिटेल्स यांची तांत्रिक तपासणी करण्यात यावी अशीही मागणी सकल धनगर समाजाच्यावतीने करण्यात आली आहे.

# जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून एकरी ५० हजार रुपये अनुदान द्या –डॉ. मीनल पाटील खतगावकर

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात यावर्षी अल्पप्रमाणात पाऊस झाल्यामुळे शेतकरी आर्थिक व नैसर्गिक संकटात सापडला असून, मागील एक महिन्यापासून पावसाने दडी मारल्यामुळे नांदेड जिल्ह्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे तातडीने नांदेड जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करुन प्रति एकरी ५० हजार रुपये अनुदान देण्याची मागणी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षा तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. मीनल पाटील खतगावकर यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.



वाढते तापमान, कडक ऊन व जमीनीतील ओलावा कमी झाल्यामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, मूग, उडीद, कापूस, तूर आदी पिके वाकून लागली आहेत. पावसाअभावी विहिरी, नदी-नाले कोरडी पडली आहेत. सोयाबीनच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत असताना पावसाअभावी दाणे भरत नाहीत व शेंगा गळुन जात आहेत. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. शेतकऱ्यांच्या बी-बियाणे, फवारण, मजुरीचा खर्चसुध्दा निघत नाही. त्यामुळे नुकसानभरपाई म्हणून शेतकऱ्यांना ५० हजार प्रति एकरी अनुदान द्यावे, कृषी व महसूल विभागाने तात्काळ पंचनामे करावे, पीक विमा मंजूर करावा, पीक कर्ज व कर्जाचे पुनर्गठण करावे, पीक विम्याची २५ टक्के आगाऊ रक्कम मंजूर करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

# सायन्स कॉलेज आणि शिवा ग्लोबल ॲग्रोमध्ये एमओयू; विद्यार्थ्यांना आता थेट उद्योगात प्रशिक्षण



**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी सायन्स कॉलेज, नांदेड आणि शिवा ग्लोबल ॲग्रो इंडस्ट्रीज यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या करारांतर्गत बी.एस्सी. च्या विद्यार्थ्यांसाठी On-the-Job Training (OJT) राबवण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील कार्यपद्धती, आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादन प्रक्रिया यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.

शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार असून यातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविकास आणि रोजगारक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमाला शिवा ग्लोबल ॲग्रोचे संचालक मधुसूदन कलंत्री, सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, रसायनशास्त्र, विश्लेषणात्मक रसायनशास्त्र, ॲग्रोकेमिकल्स अँड फर्टिलायझर्स विभागाचे प्रमुख डॉ. डी. आर. मुंडे, चंद्रशेखर अय्यर आणि कार्तिक जाधव आदी उपस्थित होते.

## हळदव येथे शिक्षकदिन साजरा

**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यातील मौजे हळदव येथे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हळदव येथे शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शेख, गावाचे सुपुत्र मुकुंद पवार, आढाव, पवार, गजभारे आदी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तसेच अंगणवाडी शिक्षिका आरती वडजे, लक्ष्मीबाई टीमकीकर, धोंडियाबाई इंगोले यांचाही स्वागत सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास गावाचे उपसरपंच प्रल्हाद पाटील वडजे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष माधव पवार, उपाध्यक्ष नरेश वडजे, संदीप पाटील शिंदे, सदस्य सचिन वडजे, माधव वडजे, सचिन वडजे, अरविंद पवार यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

# शासनाने दिलेल्या आश्वासनांची तत्काळ अंमलबजावणी करा, अन्यथा तीव्र आंदोलन; शिवसेना उपजिल्हाप्रमुख सतीश पाटील उमरेकर यांचा इशारा

**लोहा (प्रतिनिधी)**–नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी विविध मंत्रिमंडळ बैठकांमध्ये करण्यात आलेल्या घोषणा आणि रखडलेली विकासकामे तातडीने पूर्ण करून दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख तथा लोहा पंचायत समितीचे माजी सभापती सतीश पाटील उमरेकर यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.




शिवसेनेच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या आदेशानुसार हे निवेदन लोहा तहसीलदारांना सादर करण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्याचा विकास आणि अनुशेष भरून काढण्यासाठी विविध सरकारांच्या काळात छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाच्या बैठका पार पडल्या. यामध्ये नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या होत्या.

सप्टेंबर २०१६ मधील तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठक असो, किंवा १६ सप्टेंबर २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक असो; घोषणा होऊन अनेक वर्षे उलटली तरी अनेक कामे अद्याप प्रलंबित आहेत. काही कामे केवळ कागदावरच असून काहींची गती अत्यंत संथ आहे. त्यामुळे या विकासकामांचा प्रत्यक्ष लाभ जनतेला कधी मिळणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मराठवाड्याचा विकास... तुमसे ना हो पायेगा या घोषवाक्याखाली १ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जनजागरण व आंदोलन मोहीम राबवली जात आहे. शासनाने या आश्वासनांची तातडीने अंमलबजावणी केली नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सतीश पाटील उमरेकर यांनी दिला आहे. तसेच सदर निवेदन राज्य सरकारकडे त्वरित पाठवावे, अशी मागणी त्यांनी केली. निवेदन देतेवेळी शिवसेनेचे लोहा-कंधार विधानसभा प्रमुख वसंत शिंदे, लोहा तालुकाप्रमुख बालाजी गाडेकर, जिल्हा संघटक शेषराव दिघे, नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख पद्माकर सावंत, अल्पसंख्याक तालुकाप्रमुख सय्यद अकबर सय्यदपीर व गजानन मुरीडकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मसापच्या जिल्हा साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर

**नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाडा साहित्य परिषद नांदेड शाखेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या तिसऱ्या जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर यांची निवड करण्यात आली आहे. येत्या ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात लोहा येथील डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे हे संमेलन आयोजित करण्यात येणार आहे.



संमेलनाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मसाप शाखा नांदेडच्या कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत स्वागताध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर यांच्या नावाची निवड करण्यात आली. निवडीनंतर मसाप शाखा नांदेडच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

मराठवाडा साहित्य परिषदेचे केंद्रीय कार्यकारी सदस्य आणि ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. अध्यक्षस्थानी मसाप नांदेड शाखेचे अध्यक्ष बालाजी इबितदार होते. कार्यवाह प्रा. महेश मोरे यांच्यासह दिगंबर कदम, श्रीनिवास मस्के, राम तरटे, प्रा. डॉ. संजय जगताप, प्रा. धाराशिव शिराळे, निजाम गवंडगावकर , प्रा. ललिता बोकारे, अनुजा डोईफोडे, ॲड. विजयकुमार भोपी, बालाजी भागानगरे, मंगला फुलारी आदींची उपस्थिती होती.

या जिल्हास्तरीय साहित्य संमेलनाच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील साहित्यिक, कवी, लेखक आणि रसिकांना एकत्र येण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार असून, विविध साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

## नांदेडमध्ये १३ सप्टेंबरला बौद्ध समाजातील पुनर्विवाहेच्छुकांसाठी वधू-वर परिचय मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)** – समाजामध्ये दिवसेंदिवस घटस्फोटांचे प्रमाण वाढले असून, घटस्फोटानंतर संबंधित युवक-युवतींसह त्यांच्या कुटुंबाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. अशा वेळी पुनर्विवाहासाठी योग्य स्थळ शोधणे अत्यंत कठीण होते. हीच बाब लक्षात घेऊन प्राची बौद्ध वधू-वर सूचक केंद्र आणि बहुजन संघर्ष सेनेच्या संयुक्त विद्यमाने बौद्ध समाजातील विधवा, विधुर, घटस्फोटित व इतर पुनर्विवाहेच्छुकांसाठी विशेष वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा रविवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान शहरातील प्रतीक मोटार ड्रायव्हिंग स्कूल, आनंद नगर चौक, नांदेड येथे पार पडेल.

या मेळाव्यात विधवा, विधुर, घटस्फोटित, अपत्य असलेले किंवा नसलेले, तसेच न्यायालयात घटस्फोटाची केस प्रलंबित असलेले अनेक विवाहइच्छुक उमेदवार व त्यांचे नातेवाईक सहभागी होणार आहेत. इच्छुकांनी नावनोंदणीसाठी ९८९०६१६१०३ किंवा ९८२३९४९४९४ या क्रमांकावर संपर्क साधावा. या अत्यंत उपयुक्त व सामाजिक उपक्रमाचा समाजातील गरजूंनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन सुखदेव चिखलीकर यांनी केले आहे.

# लाडके मायबाप योजनेचा १ ऑक्टोबरपूर्वी निर्णय घ्या; डॉ. हंसराज वैद्य यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाने 'लाडके मायबाप योजना' तातडीने सुरू करून राज्यातील पात्र व गरजवंत ज्येष्ठ नागरिकांना दरमहा ५ हजार रुपये मानधन देण्याचा ऐतिहासिक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी ङ्गेस्कॉमच्या उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी केली आहे. शासनाने १ ऑक्टोबरपूर्वी या मागणीची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यासह 'अन्नपाणी त्याग' आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.



महाराष्ट्रातील विस्थापित, आदिवासी, निराधार, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, विधवा व परित्यक्ता तसेच दिव्यांग ज्येष्ठ नागरिकांना वृद्धापकाळात सन्मानाने जगता यावे, यासाठी ही योजना अत्यंत आवश्यक असल्याचे डॉ. वैद्य यांनी स्पष्ट केले. दोन वेळचे जेवण आणि वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक आधार मिळून ज्येष्ठ नागरिक कुटुंबावर भार ठरू नयेत, हा या मागणीमागील मुख्य उद्देश आहे.

या संदर्भात उत्तर मराठवाडा ङ्गेस्कॉमच्या वतीने ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री देवेंद्र ङ्गडणवीस, उपमुख्यमंत्री, सामाजिक न्यायमंत्री तसेच विरोधी पक्षनेत्यांना ईमेलद्वारे स्मरणपत्र पाठवण्यात आले आहे. वाढती महागाई, दुष्काळसदृश परिस्थिती आणि औषधोपचाराचा वाढता खर्च यामुळे आर्थिक मदतीची गरज अत्यंत तीव्र झाली असल्याचे यात नमूद केले आहे.

'लाडकी बहीण' योजनेच्या धर्तीवर ही योजना सुरू करण्यासाठी नांदेड दक्षिणचे आमदार आनंद तिडके पाटील बोंढारकर, बसमतचे आमदार राजू भैय्या नवघरे आणि परभणीचे आमदार डॉ. राहुल पाटील यांनी विधिमंडळात सातत्याने आवाज उठवला आहे. १५ जुलै २०२५ रोजीच्या ज्येष्ठ नागरिक विधेयकाचा आणि नाशिक येथील अधिवेशनात तीन मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांचा संदर्भ देत, अद्याप ठोस निर्णय न झाल्याबद्दल डॉ. वैद्य यांनी शासनाच्या असंवेदनशीलतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा व तामिळनाडू या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांनाही सामाजिक व आर्थिक सुरक्षा मिळाली पाहिजे, असे सांगत १ ऑक्टोबरच्या जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त शासनाने ही योजना तात्काळ मंजूर करावी, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# कावड यात्रेला सहकार्य करणाऱ्या दानशूरांचा सन्मान

## पुढील वर्षी नांदेड जिल्ह्यातील सर्वात मोठी कावड यात्रा काढण्याचा संकल्प

**नायगाव (प्रतिनिधी)**– राहेर ते नरसी दरम्यान नुकत्याच पार पडलेल्या कावड यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरूपात सहकार्य करणाऱ्या दानशूर व्यक्ती, भाविक व ग्रामस्थांचा श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर, नरसी येथे बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी सन्मान करण्यात आला.



धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक बांधिलकी जपत अन्नदान, चहा, पिण्याचे पाणी, फराळ, अल्पोपहार, वाहन व्यवस्था तसेच आर्थिक स्वरूपात योगदान देणाऱ्या सेवाभावी व्यक्तींचा यावेळी गौरव करण्यात आला.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे नेते तथा नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वेदशास्त्रसंपन्न संदीप महाराज जोशी, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, माजी उपसरपंच नजीरसाब बागवान, सय्यद इस्माईलसाब, ज्येष्ठ पत्रकार गंगाधर पाटील भिलवंडे व पवन गादेवार उपस्थित होते.

श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर, नरसी येथून दि. २५ ऑगस्ट रोजी कावड यात्रेला प्रारंभ झाला होता. राहेर ते नरसी या मार्गावरून निघालेल्या या यात्रेत मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेतला. भगवान महादेवाच्या भक्तीमय जयघोषात मार्गक्रमण करणाऱ्या कावडधारी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी मार्गावरील विविध गावांमध्ये सामाजिक कार्यकर्ते, मान्यवर व ग्रामस्थांच्या पुढाकारातून पिण्याचे पाणी, चहा, फराळ, अल्पोपहार तसेच वाहनांसह विविध सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

कावड यात्रा हा केवळ धार्मिक सोहळा न राहता सेवा, श्रद्धा आणि सामाजिक एकोपा यांचा संगम ठरला. भाविकांच्या सेवेसाठी विविध स्तरांतून मिळालेल्या सहकार्याची दखल घेत दानशूर व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. अन्नदानापासून आर्थिक मदतीपर्यंत विविध स्वरूपात योगदान देणाऱ्या सेवाभावी व्यक्तींचा गौरव झाल्याने उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

## आम्रपाली साळवे यांना पीएच. डी. पदवी

**नांदेड (प्रतिनिधी)**– एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील साहायक प्राध्यापिका डॉ. आम्रपाली किशनराव साळवे यांना संगणकशास्त्र व अभियांत्रिकी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.



डॉ. साळवे यांनी श्री गुरू गोविंदसिंघ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शिक्षण संस्थेत गुरुवर्य डॉ. कल्पना पी. पैठाणे (जोंधळे) यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. 'एमआरआय प्रतिमांचा वापर करून मानवी मेंदूतील ट्यूमरचे विभाजन व शोध घेण्यासाठी प्रभावी तंत्रांची रचना' हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. स्वारातीम प्र. कुलगुरू अशोक महाजन यांनी त्यांना पीएच. डी.चे प्रमाणपत्र बहाल केले. डॉ. साळवे या २००८ पासून एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांच्या यशाबद्दल अनेकांनी अभिनंदन केले.

CMYK

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## आपला स्मार्टफोन बनेल ‘मिनी संगणक’

### तीन स्वस्त साधनांनी मिळवा लॅपटॉपसारखा अनुभव...

**वेब ब्राउझिंग, ऑनलाइन बैठक, झूम कॉल किंवा साधे दस्तऐवज तयार करणे एवढ्यापुरतेच काम मर्यादित असेल, तर त्यासाठी महागडा लॅपटॉप घेण्याची आवश्यकता नाही. स्मार्टफोनच्या मदतीनेही ही कामे सहज करता येतात. त्यासाठी काही स्वस्त साधनांचा वापर केल्यास स्मार्टफोनचे रूपांतर ‘मिनी संगणका’त करता येते. आजच्या काळातील, विशेषतः मोठ्या स्क्रीन असलेले स्मार्टफोन वेब ब्राउझिंग, ऑनलाइन बैठक आणि दस्तऐवज तयार करण्यासारखी अनेक कामे सहज हाताळू शकतात. फोनसोबत योग्य स्टँड, माउस आणि घडी करता येणारा की-बोर्ड वापरल्यास जवळपास लॅपटॉपसारखी कार्यपद्धती मिळू शकते.**

### स्टँडमुळे मिळेल लॅपटॉपसारखी स्क्रीन...

स्मार्टफोनचा प्रभावी वापर करण्यासाठी सर्वप्रथम एका चांगल्या स्टँडची गरज असते. फोन टेबलवर सपाट ठेवून काम केल्यास सतत खाली पाहावे लागते. त्यामुळे मान आणि मानेच्या स्नायूंवर ताण येऊ शकतो. फोनला डोळ्यांच्या योग्य उंचीवर ठेवण्यासाठी असा स्टँड वापरणे सोयीचे ठरते, ज्यामध्ये चुंबकीय जुळणीची सुविधा आहे. यामुळे फोन लॅपटॉपच्या स्क्रीनप्रमाणे समोर उभा ठेवता येतो. बहुतांश अँड्रॉइड स्मार्टफोनमध्ये अंगभूत चुंबक नसतो. त्यामुळे चुंबकीय साधनांचा वापर करायचा असल्यास चुंबकीय कव्हर किंवा छोटी धातूची रिंग आवश्यक ठरू शकते. ही रिंग तुलनेने स्वस्त असते. नवीन कव्हर घेण्याची गरज नसून ती जुन्या कव्हरच्या मागील बाजूस चिकटवता येते. काही स्टँडसोबत अशी रिंग आधीपासूनच दिली जाते. काही स्टँड १८० अंशांपर्यंत वळवता येतात, तर त्यांचा तळ ३६० अंशांपर्यंत फिरवता येतो. त्यामुळे आपल्या सोयीचा पाहण्याचा कोन निवडता येतो. गरजेनुसार फोन उभा किंवा आडवा ठेवूनही वापरता येतो.



### माउस आणि की-बोर्डमुळे काम होईल वेगवान...

स्मार्टफोनला लॅपटॉपसदृश बनवण्यासाठी भौतिक की-बोर्ड आणि माउस हे पुढचे महत्त्वाचे साधन आहे. टचस्क्रीन आणि आभासी की-बोर्डच्या मदतीनेही काम करता येते; मात्र स्वतंत्र माउस आणि की-बोर्ड वापरल्यास टायपिंग आणि इतर कामे अधिक वेगाने करता येतात. माउस जोडल्यावर फोनच्या स्क्रीनवर संगणकाप्रमाणे कर्सर दिसतो. त्यामुळे स्क्रीनवरील विविध पर्याय संगणकाप्रमाणे नियंत्रित करता येतात. आपल्याकडे आधीपासून वायर्ड माउस असल्यास तो फोनच्या यूएसबी-सी पोर्टला जोडता येतो. मात्र माउसला यूएसबी-ए जोडणी असल्यास तो आधुनिक स्मार्टफोनशी जोडण्यासाठी यूएसबी-ए ते यूएसबी-सी अडॅप्टर आवश्यक असेल. घडी करता येणारा की-बोर्ड वापरल्यास तो सहजपणे सोबत नेता येतो. त्यामुळे प्रवासात किंवा कार्यालयाबाहेर असतानाही फोनवर अधिक सोयीस्करपणे टायपिंग करता येते.

### संगणकाप्रमाणे अनेक साधने जोडता येणार

संगणकांमध्ये की-बोर्ड, माउस, पेनड्राइव्ह किंवा अन्य उपकरणे जोडण्यासाठी अनेक प्रकारचे पोर्ट उपलब्ध असतात. त्यामुळे एकाच वेळी विविध उपकरणांचा वापर करता येतो. स्मार्टफोनमध्येही अशी सुविधा मिळवण्यासाठी यूएसबी-सी हब उपयोगी ठरतो. हा हब फोनच्या यूएसबी-सी चार्जिंग पोर्टला जोडता येतो. त्यानंतर त्याला एकाच वेळी माउस, की-बोर्ड, पेनड्राइव्ह किंवा अन्य सुसंगत उपकरणे जोडता येतात. ऑनलाइन बैठका, दस्तऐवज तयार करणे तसेच मोठ्या पडद्यावर सादरीकरण दाखवणे अशा कामांसाठी हा पर्याय विशेष उपयुक्त ठरू शकतो.

### थोड्या खर्चात लॅपटॉपचा पर्याय

मोठ्या आणि जड कामांसाठी स्मार्टफोन पूर्णपणे लॅपटॉपची जागा घेऊ शकत नाही. मात्र दैनंदिन स्वरूपातील वेब ब्राउझिंग, टायपिंग, ऑनलाइन बैठक, ई-मेल आणि साधे दस्तऐवज तयार करण्यासारख्या कामांसाठी स्टँड, माउस, की-बोर्ड आणि आवश्यक असल्यास यूएसबी-सी हब यांच्या मदतीने स्मार्टफोनचा अधिक प्रभावीपणे वापर करता येतो. म्हणजेच, नवीन लॅपटॉप खरेदी करण्यापूर्वी आपल्या कामासाठी स्मार्टफोनची क्षमता आणि काही स्वस्त साधनांचा पर्यायही विचारात घेता येऊ शकतो.



## 3डी प्रिंटरच्या मदतीने कमाई करायची आहे?

**आधी जाणून घ्या कोणते प्रिंटर किती किमतीला मिळतात**

**३ डी प्रिंटिंग तंत्रज्ञानामुळे कमाईचे नवे मार्ग खुले होत आहेत. या तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार होणाऱ्या विविध वस्तूंना बाजारात मागणी वाढत आहे. आपल्या गरजेनुसार विशिष्ट वस्तू, नमुने किंवा सुटे भाग तयार करून घेण्यासाठीही अनेक जण ३डी प्रिंटिंगचा वापर करत आहेत. त्यामुळे ३डी प्रिंटर घेऊन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल, तर बाजारात उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या प्रिंटरची माहिती घेणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक प्रिंटरची कार्यपद्धती, वापराचे क्षेत्र आणि किंमत वेगवेगळी असते. सध्या बाजारात फ्यूज्ड डिपॉझिशन मॉडेलिंग (FDM), स्टीरिओलिथोग्राफी (SLA), सिलेक्टिव्ह लेझर सिंटरिंग (SLS) यांसह विविध प्रकारचे ३डी प्रिंटर उपलब्ध आहेत. आपल्या गरजेनुसार योग्य प्रिंटरची निवड करता येते.**



### फ्यूज्ड डिपॉझिशन मॉडेलिंग (FDM) प्रिंटर

जगभरात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या ३डी प्रिंटरच्या प्रकारांमध्ये FDM प्रिंटरचा समावेश होतो. तुलनेने कमी किमतीत उपलब्ध असल्यामुळे नवशिक्यांसाठी हा पर्याय उपयुक्त ठरतो. या प्रिंटरमध्ये प्लास्टिकचे तंतू (फिलामेंट) गरम करून वितळवले जातात आणि नोजलच्या माध्यमातून त्याचे एकावर एक थर तयार केले जातात. अशा प्रकारे अंतिम वस्तू तयार होते. शालेय प्रकल्प, प्राथमिक नमुना निर्मिती आणि घरगुती वापरासाठी FDM प्रिंटर मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. भारतात या प्रकारच्या प्रिंटरची किंमत साधारण १५ हजार ते ४५ हजार रुपये असू शकते. अधिक वेगवान किंवा अर्ध-व्यावसायिक प्रिंटरची किंमत ५० हजार ते २ लाख रुपये असू शकते. व्यावसायिक आणि औद्योगिक FDM प्रणालीसाठी ५ लाख ते ४० लाख रुपयांपर्यंत खर्च येऊ शकतो.

### स्टीरिओलिथोग्राफी (SLA) 3डी प्रिंटर

FDM प्रिंटरमध्ये प्लास्टिकच्या तंतूंचा वापर केला जातो; मात्र SLA प्रिंटरमध्ये द्रव रेजिन वापरले जाते. अतिनील (UV) प्रकाशाच्या साहाय्याने हे द्रव रेजिन घट्ट करून वस्तू तयार केली जाते. अतिशय बारीक आणि अचूक नमुने तयार करण्यासाठी या प्रकारच्या प्रिंटरचा वापर केला जातो. दागिन्यांच्या रचनेतील नमुने, दंतचिकित्सेसाठी लागणारे नमुने आणि बारकाव्यांनी युक्त खेळणी किंवा अन्य वस्तू तयार करण्यासाठी SLA प्रिंटर उपयुक्त ठरतात. प्राथमिक स्तरावरील डेस्कटॉप रेजिन प्रिंटरची किंमत साधारण २० हजार ते ६० हजार रुपये असते. व्यावसायिक डेस्कटॉप प्रणालीसाठी १.५ लाख ते ५ लाख रुपये, तर मोठ्या औद्योगिक SLA प्रिंटरसाठी १५ लाख ते ७० लाख रुपयांपर्यंत खर्च येऊ शकतो.

### मटेरियल जेटिंग आणि बाइंडर जेटिंग

मटेरियल जेटिंग तंत्रज्ञानात द्विमितीय शाई फवारणी यंत्राप्रमाणे फोटोपॉलिमरच्या अतिशय सूक्ष्म थेंबांचा वापर केला जातो. त्यानंतर अतिनील प्रकाशाच्या साहाय्याने हे थेंब घट्ट केले जातात, तर बाइंडर जेटिंगमध्ये भुकटीच्या थरांवर द्रव स्वरूपातील बंधक पदार्थ फवारला जातो. याचा वापर विशेषतः वाळूच्या साच्यांसारख्या औद्योगिक वस्तू तयार करण्यासाठी केला जातो. हे प्रिंटर प्रामुख्याने औद्योगिक वापरासाठी असतात. त्यांची किंमत साधारण ३५ लाख रुपयांपासून सुरू होऊन २ कोटी रुपयांपेक्षा अधिक असू शकते.

### रॅपिड लिक्विड 3डी प्रिंटिंग

रॅपिड लिक्विड ३डी प्रिंटिंग ही तुलनेने वेगळी पद्धत आहे. यामध्ये वस्तूची निर्मिती जेलच्या आत केली जाते. रोबोटिक नोजलच्या साहाय्याने जेलमध्ये थेट द्रवरूप सिलिकॉन, रबर किंवा फोम सोडला जातो. जेल गुरुत्वाकर्षणाचा परिणाम कमी करून तयार होणाऱ्या वस्तूला आधार देते. त्यामुळे स्वतंत्र आधाररचना तयार करण्याची आवश्यकता राहत नाही. परिणामी मोठ्या आकाराचे फर्निचर तसेच बूट, पिशव्या यांसारख्या लवचिक वस्तू तुलनेने कमी वेळेत तयार करता येतात. या पद्धतीमुळे प्रिंटिंगसाठी लागणाऱ्या साहित्याचीही बचत होऊ शकते. कारण वस्तूला आधार देण्यासाठी स्वतंत्र रचना तयार करण्याची आवश्यकता नसते. मात्र हा प्रकार सध्या सर्वसामान्य घरगुती किंवा छोट्या व्यावसायिक वापरासाठी सहज उपलब्ध नाही. त्याचा वापर प्रामुख्याने मोठ्या औद्योगिक स्वयंचलित प्रणाली आणि संशोधन प्रयोगशाळांमध्ये केला जातो. भारतात अशा प्रकारच्या प्रिंटरची किंमत साधारण ८० लाख रुपयांपासून सुरू होऊन २.५ कोटी रुपये किंवा त्याहून अधिक असू शकते.

### सिलेक्टिव्ह लेझर सिंटरिंग (SLS) 3डी प्रिंटर

SLS प्रिंटरमध्ये द्रव रेजिन किंवा प्लास्टिकचे तंतू वापरले जात नाहीत. यामध्ये प्रामुख्याने नायलॉनच्या भुकटीचा वापर केला जातो. उच्च क्षमतेच्या लेझरच्या साहाय्याने या भुकटीतील कण एकमेकांशी जोडले जातात आणि त्यातून वस्तू तयार केली जाते. या तंत्रज्ञानाचा मोठा फायदा म्हणजे वस्तू तयार करताना स्वतंत्र आधाररचनेची आवश्यकता अनेकदा भासत नाही. त्यामुळे गुंतागुंतीच्या आकाराच्या वस्तूही तयार करता येतात. भारतात SLS प्रिंटरची सुरुवातीची किंमत साधारण ७ लाख रुपये असू शकते. प्रगत मॉडेलची किंमत २५ ते ३० लाख रुपये असू शकते. औद्योगिक दर्जाच्या प्रिंटरची किंमत १.५ कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकते.

### योग्य प्रिंटरची निवड महत्त्वाची

३डी प्रिंटिंगच्या माध्यमातून व्यवसाय सुरू करण्याचा विचार असल्यास सुरुवातीला आपल्या उत्पादनाची गरज, ग्राहकवर्ग, वापरले जाणारे साहित्य, वस्तूंचा आकार आणि अपेक्षित उत्पादनक्षमता यांचा विचार करणे आवश्यक आहे. कमी गुंतवणुकीत सुरुवात करायची असल्यास FDM किंवा काही प्राथमिक स्तरावरील रेजिन प्रिंटर उपयुक्त ठरू शकतात. तर औद्योगिक उत्पादनासाठी अधिक क्षमतेच्या आणि महागड्या प्रणालींची आवश्यकता भासू शकते. त्यामुळे केवळ प्रिंटरची किंमत पाहण्याऐवजी साहित्याचा खर्च, देखभाल, वीज वापर, उत्पादनाचा वेग आणि तयार वस्तूला असलेली बाजारातील मागणी यांचाही विचार करून गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे.



## 80-90 च्या दशकातील दिव्या भारतीसारखा पारंपरिक बॉलिवूड लूक; खास प्रॉम्प्टच्या मदतीने तयार करा विंटेज छायाचित्र!



**८० आणि ९० च्या दशकातील बॉलिवूड अभिनेत्रींनी साकारलेला पारंपरिक पेहराव आजही तितकाच लोकप्रिय आहे. त्या काळातील कांजीवरम साडी, बनारसी लेहंगा, पारंपरिक दागिने, गजरा आणि जुन्या ३५ मिमी चित्रपटांसारखा छायाचित्रणाचा परिणाम यामुळे एक वेगळाच देखणा, नॉस्टॅल्जिक लूक तयार होत असे. आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) मदतीने हाच जुन्या काळातील लूक आपल्या छायाचित्राला देता येतो. यासाठी एआय प्रतिमा तयार करणाऱ्या साधनांमध्ये काही विशिष्ट सूचना अर्थात ‘प्रॉम्प्ट’ द्यावे लागतात. त्यानंतर आपल्या साध्या छायाचित्राचे रूपांतर ८०-९०च्या दशकातील बॉलिवूड नायिकेच्या पारंपरिक लूकमध्ये करता येते.**

### जुन्या बॉलिवूडचा मोह आजही कायम

८० आणि ९०च्या दशकातील बॉलिवूड चित्रपट त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैली, सदाबहार संगीत आणि लक्षात राहणाऱ्या फॅशनसाठी ओळखले जातात. त्या काळातील अभिनेत्रींनी साकारलेल्या पारंपरिक रूपात साधेपणा, नजाकत आणि आकर्षण यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळत असे. श्रीदेवी, माधुरी दीक्षित, जुही चावला, रवीना टंडन आणि करिश्मा कपूर यांसारख्या अभिनेत्रींनी भारतीय पारंपरिक पेहरावाला रुपेरी पडद्यावर विशेष लोकप्रियता मिळवून दिली. त्यामुळे आजच्या डिजिटल पिढीलाही या जुन्या शैलीचे आकर्षण कायम आहे. सध्या समाजमाध्यमांवर ८०-९०च्या दशकातील लूक असलेली एआय-निर्मित छायाचित्रे मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत आहेत. अनेक जण आपल्या जुन्या छायाचित्रांना या काळातील पारंपरिक आणि चित्रपटसृष्टीसदृश रूप देत आहेत.

### एआय प्रॉम्प्ट तयार करताना या गोष्टी लक्षात ठेवा...

८० आणि ९० च्या दशकातील लूक एआयच्या माध्यमातून अचूकपणे साकारण्यासाठी पोशाख, मेकअप, केशरचना आणि पार्श्वभूमी यांचा बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. त्या काळातील पारंपरिक लूकमध्ये जरीकाम केलेल्या कांजीवरम किंवा बनारसी साड्या, रेशमी लेहंगे, जड मांगटिका, नथ, झुमके आणि केसांमध्ये माळलेला ताज्या मोगऱ्याचा गजरा विशेष लोकप्रिय होता. मेकअपमध्ये गडद रंगाची उठावदार लिपस्टिक, डोळ्यांना ठसठशीत विंग्ड आयलाइनर आणि कपाळावर मोठी गोल किंवा चंद्रकोरीच्या आकाराची बिंदी ही या लूकची वैशिष्ट्ये होती. एआय प्रॉम्प्टमध्ये ‘३५ मिमी फिल्म फोटोग्राफी’, ‘सौम्य पसरलेला प्रकाश’, ‘विंटेज रंगछटा’ आणि ‘रेट्रो परिणाम’ यांसारख्या सूचना दिल्यास जुन्या चित्रपटांसारखी सिनेमॅटिक आणि जुन्या आठवणी जागवणारी छायाचित्रशैली मिळू शकते.

### एआयच्या मदतीने असे तयार करा छायाचित्र...

सर्वप्रथम ChatGPT उघडून लॉग इन करा. त्यानंतर ‘+’ चिन्हावर क्लिक करून आपले स्पष्ट छायाचित्र अपलोड करा. आवडता प्रॉम्प्ट टाइप करा. त्यानंतर एआय आपल्या सूचनेनुसार छायाचित्र तयार करेल. छायाचित्र जितके स्वच्छ आणि स्पष्ट असेल, तितका अंतिम परिणाम चांगला मिळण्याची शक्यता असते. सेल्फी छायाचित्र दिल्यास त्याच धर्तीवर नवीन छायाचित्र तयार केले जाऊ शकते. लेहंग्यासह पूर्ण शरीराचा लूक हवा असल्यास पूर्ण शरीर दिसणारे छायाचित्र अपलोड करणे अधिक योग्य ठरेल. अशा प्रकारे काही सोप्या सूचनांच्या मदतीने आपल्या जुन्या छायाचित्राला ८०-९०च्या दशकातील बॉलिवूडच्या पारंपरिक सौंदर्याची झलक देता येते.

### 80-90च्या दशकातील पारंपरिक लूकसाठी प्रॉम्प्ट

A stunning 1990s Bollywood heroine in a traditional silk saree, vintage 35mm film photography style, soft golden lighting. She is wearing traditional gold jewelry including a mangtika, nose ring, heavy jhumkas, and a fresh jasmine flower garland (gajra) in her braided hair. Bold red lipstick, classic winged eyeliner, big round bindi on forehead. Cinematic grainy texture, warm vintage color palette, nostalgic Indian aesthetic, ultra-detailed, 8k resolution.

*दिव्या भारतीसारख्या लूकसाठी प्रॉम्प्ट*

**give me 80s traditional look like Divya Bharti**

### छोटा आणि सोपा प्रॉम्प्ट

Inspired by the colorful, graceful 1990s Bollywood lehenga styling of Sonali Bendre in “Main Maiya Yashoda,” with a traditional festive silhouette, flowing dupatta, rich ethnic embroidery, and a soft innocent Bollywood heroine charm.



## जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, श्री श्यामकुमार मसाजी बनसोडे रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. २९ वार्ड क्र. ०८ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : पोचीराम बनसोडे, **पश्चिमेस** : दत्ता बनसोडे, **दक्षिणेस** : रस्ता, **उत्तरेस** : गोदावरीबाई बनसोडे.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८१७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. १४७/१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, रामचण नयनकुमार जयस्वाल रा. कालिका गल्ली ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १४७/१ वार्ड नं. १७ शिवाजी गणपत वानखेडे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७२४/२४ दि. २६/०६/२०२४ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - परमेश्वर चव्हाण,
पश्चिमेस - परमेश्वर सुर्यवंशी,
दक्षिणेस - कॉलनी रस्ता,
उत्तरेस - सुरेश पवनेकर.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८१८

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०२ मालमत्ता क्र. ८५/१ अ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, परमेश्वर उत्तमराव कोरडे रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ८५/१ वार्ड नं. ०२ उत्तम दत्तत कोरडे व इतर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. .... दि. ०३/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - रोड, पश्चिमेस - वाळके यांचे घर, दक्षिणेस - उत्तम दत्ता कोरडे, उत्तरेस - छायाबाई सुधाकर कोरडे.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८१०

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. १४६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, राम परमेश्वर सुर्यवंशी रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १४७ वार्ड नं. १७ परमेश्वर बळीराम सुर्यवंशी यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ...... दि. ३१/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - शिवाजी वानखेडे,
पश्चिमेस - परमेश्वर बळीराम सुर्यवंशी, दक्षिणेस - रस्ता,
उत्तरेस - पवनेकर यांची प्लॉटींग.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८०९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. ४७४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मनोरमा मनोहर राठोड रा. कौठा ज ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४७४ वार्ड नं. १७ प्रविणकुमार जन्नावार, माधवी मिलींद जन्नावार व इतर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०५६/२६ दि. ३१/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - प्लॉट क्र. ३२,
पश्चिमेस - ९ मीटरचा रस्ता,
दक्षिणेस - नरसिंग मादसवाद,
उत्तरेस - प्लॉट क्र. १८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

# शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेड

**परिशिष्ट - IV**
**नियम - ८ (२) पहा**

स्थावर मालमत्तेचा ताबा घेतलेली नोटीस

जसे की,

खाली स्वाक्षरी करणार हे शंकर नागरी सहकारी बँक लि; नवा मोंढा, नांदेड दि सेक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल असेट्स अँण्ड इनफॉरसमेंट ऑफ सेक्युरीटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अंतर्गत प्राधीकृत अधिकारी आहेत व त्यांनी सदर कायद्याचे कलम १३ (२) नियम (९) सेक्युरिटी इंटरेस्ट इनफॉरसमेंट रुल्स २००२ नुसार दि.२६-०७-२०२२ रोजी बँकेचे कर्जदार मे.माऊली कृषी सेवा केंद्र, प्रो.प्रा.श्री.ज्ञानेश्वर केशवराव पवार यांना नोटीस मध्ये नमुद केलेली रक्कम रु.६,९१,५७०/- (अक्षरी रक्कम सहा लाख एक्यानवे हजार पाचशे सत्तर रुपये) + पुढील होणारे व्याज ६० दिवसाच्या आत भरणा करण्यासाठी डिमांड नोटीस दिलेली होती. परंतु कर्जदाराने वरील नोटीसमध्ये नमुद केलेल्या रक्कमेचा भरणा न केल्यामुळे सदर नोटीस द्वारे संबंधीत कर्जदार व सर्व जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, खाली सही करणाऱ्यांनी सदरहु कायद्याचे कलम १३ (४) व नियम ९ नुसार त्यांना असलेल्या अधिकाराचा वापर करुन इतर मालमत्ता पैकी खालील नमुद स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा दि.२९.०८.२०२६ रोजी घेतलेला आहे. तसेच कर्जदार, प्रॉपर्टी धारक व सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्ते संदर्भात कोणताही खेरदीचा/विक्रीचा व्यवहार किंवा करार करु नये म्हणुन ताबा घेतलेल्या सदर मालमत्ते संदर्भात असा कोणताही व्यवहार केल्यास त्यावर बँकेचे दि.३१.०८.२०२६ अखेर कर्ज रक्कम रु.१०,४५,५२२/- (अक्षरी रक्कम दहा लक्ष पंचेचाळीस हजार पाचशे बावीस रुपये) व त्यावर होणारे व्याज याचा बोजा असेल.

**ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचा खालील वर्णनाप्रमाणे तपशील**

१) ग्रा.पं.निवघा, ता.मुदखेड, जि.नांदेड हद्दीतील मालमत्ता क्र.८८ श्री.ज्ञानेश्वर केशवराव पवार यांच्या नावाने आहे.
२) ग्रा.पं.निवघा, ता.मुदखेड, जि.नांदेड हद्दीतील मालमत्ता क्र.९० श्री.ज्ञानेश्वर केशवराव पवार यांच्या नावाने आहे.

**चर्तु:सीमा :-मालमत्ता क्रं.88 (13.80x30=414 चौ.फुट) पुर्वेस-** रस्ता **पश्चिमेस** - ज्ञानेश्वर पवार **दक्षिणेस** - स्वत:ची मालमत्ता **उत्तरेस**- रस्ता

**चर्तु :सीमा :- मालमत्ता क्रं.90 (10x56=560 चौ.फुट) पुर्वेस-** केशव पुरभाजी **पश्चिमेस** - महादु गंगाराम **दक्षिणेस**- संभाजी गणोजी **उत्तरेस**- रस्ता

स्वाक्षरीत/-
**प्राधिकृत अधिकारी**
शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड
मुख्य कार्यालय, नवा मोंढा, नांदेड.

# त्वरीत पाहिजेत

**सेवानिवृत्त वेतनधारक कर्मचाऱ्याच्या वास्तुची जबाबदारी सांभाळण्यासाठी पूर्णवेळ सेवा उपलब्ध करून देणारी वय वर्ष १९ वरील सुशिक्षीत (स्कुटी चालक, स्पर्धा परीक्षा देणारी) मुलगी त्वरीत पाहिजे. संबंधितासाठी राहण्यासाठी, जेवणाची सुविधा उपलब्ध अपेक्षेसह प्रत्यक्ष संपर्क साधा.**

**संपर्क मोबाईल**
**९६२३२२०५९४, ७६६६७७१६८४**
**जुना कौठा (नाका), पोलीस चौकीसमोर, नांदेड**

## जि प शिक्षक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. विकासनगर, कौठा, नांदेड

जा. क्रं. /2026-2027 दिनांक 12/09/2026

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदा करीता)**

जि.प. शिक्षक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. विकास नगर, कौठा, नांदेड चे सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सन 2025-2026 या वर्षाची वार्षीक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष श्री. उत्तम शंकरराव वरपडे यांचे अध्यक्षतेखाली दि.27/09/2026 रोजी रविवारी सकाळी ठिक 11.00 वाजता संस्थेचे कार्यालय बालाजी मंदीर परिसर विकास नगर, कौठा, नांदेड येथे घेण्यात येणार आहे. बैठकी मध्ये खालील विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात येणार आहेत. तरी कृपया बैठकीस वेळेवर अवश्य उपस्थित राहवे ही विनंती.

प्रति,
श्री. ______________________________

**रा. सभासद जि.प. शिक्षक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**विकास नगर, कौठा, नांदेड.**

**सभेपुढील चर्चेचे विषय**

| | |
|---|---|
| विषय क्र.1 | मागिल वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृतांत वाचून कायम करणे. |
| विषय क्र.2 | दि.31/03/2026 अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल जमा खर्च पत्रक, नफा, तोटा पत्रक, ताळेबंद पत्रकास मान्यता देणे बाबत. |
| विषय क्र.3 | सन 2026-2027 साला साठीचे अंदाज पत्रकास मान्यता देणे बाबत. |
| विषय क्र.4 | सन 2025-2026 सालाचे लेखा परिक्षण अहवालाचे वाचन व लेखा परिक्षण दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे बाबत. |
| विषय क्र.5 | सन 2025-2026 मध्ये झालेले प्लॉट हस्तांतरणास मान्यता देणे बाबत. |
| विषय क्र.6 | सन 2026-2027 सालाचे लेखा परिक्षणाससाठी संवैधानिक लेखा परिक्षकाची नियुक्ती करणे बाबत. |
| विषय क्र.7 | अध्यक्षाच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणे. |

कार्यकारी मंडळाचे आदेशावरुन
गंगाधर कोंडीबाराव बडवणे
सचिव

नोंदणी नं.११०२/८४
स्थापना दिनांक ७.३.१९८४

|| बिना सहकार नही उध्दार ||

दिनांक ०५.०९.२०२६
जा.क्र ५५७/२०२६

# पांचाली तालुका शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित
**ता.कंधार /लोहा जि.नांदेड**

## ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

पांचाली तालुका शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित ता.कंधार /लोहा च्या सर्व सभासदांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,दिनांक ३१.०३.२०२६ रोजी संपणाऱ्या आर्थिक सहकारी वर्ष २०२५-२०२६ ची संस्थेची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २०.०९.२०२६ रोज रविवारी सकाळी ठिक ११.४५ वाजता संस्थेचे प्राधिकृत अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी -१ **श्री बालाजी भुजंगराव बोधगिरे** यांचे अध्यक्षतेखाली संस्थेचे मुख्य कार्यालय गजानन नगर,कंधार ता.कंधार जि.नांदेड येथे घेण्याचे निश्चित केले आहे.तरी आपण सभेस उपस्थित राहुन सहकार्य करावे ,ही विनंती

*** सभेपुढील विषय ***

१. सभासदाच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार व आदर्श शिक्षकांचा सत्कार .
२. मागील दि.२०.०९.२०२५ रोजीच्या ४३ व्या वार्षिक सर्व साधारण सभेचा इतिवृतांत वाचुन कायम करणे.
३. दि.०१.४.२०२५ ते ३१.३.२०२६ अखेरचे जमा खर्च पत्रक,नफा तोटा पत्रक,ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे .
४. संस्थेच्या दिनांक ३१.३.२०२६ आखेरच्या नफा वाटपास मंजूरी देणे.
५. संस्थेच्या दि.०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या वर्षीच्या लेखा परीक्षण अहवालास मंजुरी देणे व दोष दुरूस्तीस मान्यता देणे व वाचुन कायम करणे.
६. संस्थेच्या दि.०१.०४.२०२६ ते ३१.०३.२०२७ या वर्षासाठी प्रमाणित लेखा परीक्षकाची नियुक्ती करण्यास मान्यता देणे.
७. संस्थेच्या सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे व सन २०२६ -२०२७ च्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
८. संस्थेच्या थकबाकी दार सभासदाकडील कर्जाची थकबाकी वसुल करण्यासाठी कायदेशीर कार्यवाही करण्यास मान्यता देणे.
९. संस्थेच्या सभासदांच्या कर्ज वसुली व मासिक हाप्ता वसुलीकरीता एस.बी.आय.बँकेची ई माईडेड प्रणालीचे रजिस्टेशन करण्यास मान्यता देणे (सि.एम.पी.प्रणाली व्दारे ) .
१०. पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थासाठीची सुधारीत आदर्श उपविधी २०२६ स्विकारणे .व आदर्श उपविधी क्र.६० अ.दुरूस्तीस मान्यता देणे .
११. सभासदाचा विमा काढण्यास मान्यता देणे
१२. प्राधिकृत अधिकाऱ्याच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेच्या विषयस मान्यता देणे.

**श्री बालाजी भुजंगराव बोधगिरे**
प्राधिकृत अधिकारी तथा सहकार
अधिकारी श्रेणी -१

**पांचाली तालुका शिक्षक सहकारी पतसंस्था मा. ता.कंधार/लोहा जि.नांदेड**

नोट :-१.कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास सभा एका तासानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी कार्यक्रम पत्रिकेवरील विषयाप्रमाणे कामकाजास सुरूवात केली जाईल.तेंव्हा कोरमची अट राहणार नाही .
२. सभासदांना वरील विषयावर कांही प्रश्न विचारावयाचे असल्यास दि.१८.०९.२०२८ पर्यंत लेखी प्रश्न संस्थेत सादर करावेत मुदतीनंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.गुणपत्रक दि.१८.०९.२०२६ पर्यंत कार्यालयात सादर करावे .
प्रतिलीपी,
१. मा.जिल्हाउपनिबंधक,सहकारी संस्था नांदेड २. मा.सहाय्यकनिबंधक,सहकारी संस्था कंधार ३.मा.सरव्यवस्थापक,नां.जि.म.बँक जि.नांदेड ४.मा.शाखाधिकारी ना.जि.म.स.बँक शा.कंधार ५. मा. लेखापरिक्षक ,लेखापरिक्षण सहकारी संस्था कंधार

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की श्री रावसाहेब जीवनाजी वैद्य, श्री मधुकर जीवनाजी वैद्य जयप्रकाशनगर ता.जि. नांदेड हे आमच्या जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, फत्तेजंगपुर, तालुका व जिल्हा नांदेड. या संस्थेचे सभासद असून, नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील संस्थेच्या मालकिची जमिन गट नंबर ५६/५७ फत्तेजंगपूर, ता. जि. नांदेड मध्ये संस्थेच्या लेआऊट प्रमाणे त्यांच्या मालकी ताब्यातील प्लॉट एकेचाळीस हा आहे. सदरील प्लॉट नंबर एकेचाळीस श्री ऋषिकेश मधुकर वैद्य यांच्या नावावर हस्तांतरण कार्यवाही करून, प्लॉट हस्तांतरण करून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह, त्यांनी संस्थेकडे विनंती अर्ज दिलेला आहे. तरी या सदरील प्लॉट हस्तांतरण कार्यवाहीस कोणाचा आक्षेप असल्यास (७) दिवसाच्या आत अध्यक्ष अथवा सचिव यांच्या कडे मुळ कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. ह्या कालावधीत आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही. असे समजुन वरीलप्रमाणे प्लॉट ची हस्तांतरण कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सचिव** **अध्यक्ष**
**जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**फत्तेजंगपुर, तालुका व जिल्हा नांदेड.**

# टी.सी. हरवली

माझी अमोल रामानंद महिपाळे या नावाची दहावी पासची टी.सी. सांगवी ते चैतन्यनगर नांदेड प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क मोबाईल**
**मो.नं. ८३५५९१६४०३**

## जाहीरनामा
**नगर पंचायत हिमायतनगर**

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सविता संतोष कदम रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतु:सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. ...... मधील मालमत्ता / घर क्र. १७३/२ वार्ड क्र. ०७ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : सुभद्रा कदम, **पश्चिमेस** : किशन कदम, **दक्षिणेस** : रस्ता, **उत्तरेस** : बाबुराव बनसोडे.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्टॉफ को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., नांदेड.

जा.क्र. ६७/वा स/२०२६-२०२७ दिनांक : १२/०९ / २०२६

**फक्त सभसदांकरिता**

**▪ ६६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ▪**

संस्थेच्या सर्व मान्यवर सभासद बांधवांना विनंती पुर्वक कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाची ६६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा दिनांक २६/०९/२०२६ रोज शनिवार सकाळी ठिक ११.०० वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंद बाबाराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली "हॉटेल ताज पाटील, आय.टी.आय. कॉर्नर, व्हि.आय.पी. रोड, नांदेड येथे आयोजीत केली आहे.

तरी सदर सभेस आपण आवश्य उपस्थित राहावे हि विनंती.

**▪ सभेची विषय सुची ▪**

| | |
|---|---|
| विषय क्र. १ ला :- | मागील दिनांक २१/०९/२०२५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृतांत वाचून त्यास मंजूरी देणे बाबत. |
| विषय क्र. २ रा :- | दिनांक ३१/०३/२०२६ अखेर पुर्ण झालेल्या आर्थिक वर्षाचा मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या कामकाजाचा अहवाल व दिनांक ३१/०३/२०२६ अखेर संपलेल्या आर्थीक वर्षाचे ताळेबंदास, नफातोटा पत्रकास मंजूरी देणे. |
| विषय क्र. ३ रा :- | सन २०२५-२०२६ या आर्थीक वर्षात झालेल्या संचालक मंडळाने सादर केलेल्या नफा वाटपास मंजूरी देणे बाबत. |
| विषय क्र. ४ था :- | सन २०२६-२०२७ साला करीता अंदाज पत्रकास मंजूरी देणे व २०२५-२०२६ या वर्षात अंदाज पत्रका पेक्षा कमी / जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत. |
| विषय क्र. ५ वा :- | सन २०२५-२०२६ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे बाबत. |
| विषय क्र. ६ वा :- | संस्थेच्या सन २०२६-२०२७ चे वैधानीक लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नेमणूक करणे बाबत. |

**नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्टॉफ को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., नांदेड.**

| | |
|---|---|
| विषय क्र. ७ वा :- | संचालक मंडळ तर्फे सुचविलेल्या पोटनियम दुरुस्ती करणे बाबत पोटनियम क्र.एफ. १.१०.२(अ) सभासद नियमीत कर्ज मर्यादा रु. १५,००,०००/- वरुन २०,००,०००/- व पोटनियम क्रमांक १.१०.२(ब) सभासद आकस्मीक कर्ज मर्यादा रु. ६०,०००/- वरुन रु. १,००,०००/- आणि कृ.एफ.१.१०.२(ब) कर्मचारी अॅग्रीम कर्ज मर्यादा रु. १५,००,०००/- वरुन रु. २०,००,०००/- करणेस मंजूरी देणे बाबत. |
| विषय क्र. ८ वा :- | आदर्श उपविधी स्विकारणे बाबत, |
| विषय क्र. ९ वा :- | मा. अध्यक्ष साहेब यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे बाबत. |

▪ दिनांक :- २६/०९/२०२६ वार शनिवार
▪ सभेचे ठिकाण :- हॉटेल ताज पाटील
आय.टी.आय. कॉर्नर, व्हि.आय.पी.रोड, नांदेड
▪ वेळ :- सकाळी ११.०० वाजता.

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन
**अे. बी. जाधव**
प्र. व्यवस्थापक
नांदेड जि.म.सह.बँक स्टॉफ को-ऑप.
क्रेडीट सोसायटी लि. नांदेड.

------------------------- टिप -------------------------

१. गणपुर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी सुरु होईल आणि या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षीक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुलभ होण्याच्या दृष्टीने सभासदांनी संस्थेच्या व्यवहारा विषयी हवी असलेली माहिती व अडीअडचणी बाबत सभेच्या सात दिवसाचे अगोदर लेखी कळवावे व सभेच्या वेळी संबंधित विषयावर चर्चा चालु असतांना त्या बाबत विचारणा करावी. आयत्यावेळी माहिती देणे शक्य होणार नाही.

## त्वरित विकणे आहे

नांदेड-लातूर हायवे रोडवर, मुसलमान वाडीच्या अलीकडे ब्रीज जवळ, गजानन महाराज मंदिर जवळ गट नं-108 मधील 200x100=20000 फुट किंवा 100x100=10000 फुट जागा व त्यावरील 13 दुकान बांधकामासह तीन साईड रोडटच असलेली मालमत्ता त्वरीत विकणे आहे.

**संपर्क:-8275510006/9860020920/9765443311**

## भाडयाने देणे आहे.

1) नवा मोंढा, धनमुद्रा मल्टीस्टेटच्या बाजुला, नांदेड येथील पहिल्या मजल्यावरील अद्यावत व सर्व सोयीयुक्त असलेले दुकान13x35 गॅलरीसह त्वरित भाडयाने देणे आहे.
2) पिंपळगांव महादेव मधील गट क्रं-134 मधील 1200 स्के.फुटचा प्लॉट क्रं-12 विकणे आहे.

तरी त्वरीत संपर्क करावा.

**संपर्क:-8275510006/9890171006**

# वीज कामगार को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. नांदेड
**(पंजियन क्र. एन.एन.डी./बी.एन.के./११५-७४ दिनांक १०/६/१९७४)**

जावक क्र.वि.का.सी./सन २०२५-२०२६/६५१ दि.०८/०८/२०२६

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

वीज कामगार को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. नांदेडच्या मान्यवर सभासदांना विनंती पुर्वक कळिवण्यात येते की, संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षाची वार्षिक सर्व साधारण सभा दि. २७/०९/२०२६ रोजी रविवार सकाळी ११:०० वाजता कुसुम सभागृह यशवंत कॉलेज व्हि. आय. पी. रोड नांदेड येथे आयोजित केली आहे, सदरील सभेत खालील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घ्यावयाचे आहेत. तरी कृपया आपण सभेस उपस्थित राहुन सहकार्य करावे ही विनंती.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन,

मानदसचिव
**वीज कामगार को- ऑप क्रेडीट सो.लि.नांदेड**

**विषय सुची :-**

१) सर्वसाधारण सभेसाठी अध्यक्षाची निवड करणे.
२) मागील सर्वसाधरण सभा दि. २९.०९.२०२५ चा वृतांत वाचुन कायम करणे.
३) संचालक मंडळाचा सन २०२५-२६ चा अहवाल वाचुन कायम करणे.
४) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे जमा खर्च पत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक दि. ३१/०३/२०२६ अखेरचे वाचुन मंजुर करणे.
५) संचालक मंडळाने शिफारस केलेले २०२५-२६ वर्षाच्या नफ्याचे वाटपास मान्यता देणे.
६) सन २०२६-२०२७ चे अंदाज पत्रकास मान्यता देणे व मागील सन २०२५-२६ चे अंदाज पत्रकापेक्षा कमी/जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
७) सन २०२५-२६ मध्ये संस्थेचे नव्याने झालेल्या सभासदांचे सभासदत्वास मान्यता देणे
८) सन २०२४-२५ लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्तीस मान्यता देणे व सन २०२५-२६ साठी लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
९) आदर्श उपविधी लागू करणे बाबत.
१०) न्यायालयीन प्रक्रियेस अधिन राहून कलम ९८ प्रमाणे वसुली व लाभांश / सभासद ठेव व्याज येणे रक्कम येणे देणे करणे बाबत.
११) मा. अध्यक्ष साहेबाच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे इतर विषय.

**महत्त्वाची टिप :-**

१) सभेची गणपूर्ती न झाल्यास सदरील सभा तहकुब करून अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच विषयावर घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची गरज भासणार नाही याची नोंद घ्यावी.
२) जाहिर केलेल्या लाभांशाची रक्कम जाहीर केलेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या आत नेली पाहिजे अन्यथा ती गंगाजळीत (राखीव निधी) वर्ग केली जाईल.
३) मान्यवर सभासदांना प्रश्न मांडावयाचे असल्यास दिनांक २०/०९/२०२६ पर्यंत संस्थेस लेखी सादर करावेत, नंतर आलेल्या प्रश्नावर विचार केला जाणार नाही.

सन २०२५-२०२६ ०१ ५३ वा वार्षिक अहवाल

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## नांदेडमध्ये बँक संप यशस्वी; ५ दिवसांच्या आठवड्यासाठी ४०० कर्मचाऱ्यांचे एल्गार

- ‘पीएलआय’ मधील भेदभाव दूर करण्याची मागणी
- राज्यभरात ६० हजार कर्मचारी संपात



**नांदेड (प्रतिनिधी)**– पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करणे, पीएलआयमधील भेदभाव दूर करणे आणि प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने पुकारलेला एकदिवसीय देशव्यापी संप नांदेडमध्ये यशस्वी झाला.

शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडस्ट्रियल एरिया शाखेच्या परिसरात विविध बँकांच्या ४०० हून अधिक अधिकारी – कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने केली. यावेळी केंद्र सरकार आणि बँक व्यवस्थापनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

या संपात एसबीआय, बँक ऑफ बडोदा, महाराष्ट्र ग्रामीण बँक, कॅनरा बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, युनियन बँक यांच्यासह राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी एसबीआय अधिकारी संघटनेचे किरणकुमार जिंतूरकर, कपिल ढवळे, सदाशिव चाळणेवाड, शिल्पा जिंतूरकर, राहुल खेडकर, प्रबोधन भावसार, सौरभ राशटवाड, विनोद गडप्पा, मनोज शिवनगावकर, अपर्णा मुखेडकर, प्रमोद संघेवार, रुपेश मणी आदींनी मार्गदर्शन केले.

पाच दिवसांचा बँकिंग आठवडा तातडीने लागू करावा, पीएलआयमधील भेदभाव रद्द करून समान लाभ द्यावा आणि प्रलंबित प्रश्न सोडवावेत, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यूएफबीयू महाराष्ट्राच्या माहितीनुसार राज्यभरात ६० हजारांहून अधिक कर्मचारी या संपात सहभागी झाले होते. बँकिंग क्षेत्राच्या विकासात कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान असून संघर्षाऐवजी संवादातून निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

## आज राष्ट्रीय लोकशाही अदालतीचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांवाशमनपाच्या वतीने थकबाकी मालमत्ताधारकांसाठी एक दिवसीय जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड, जिल्हा न्यायालय नांदेड यांच्या वतीने १२ सप्टेंबर रोजी नांवाशमनपा मुख्यालय येथे राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आली आहे.



थकबाकी मालमत्ताधारकांना शास्तीवर ८० टक्के सुट देण्यात येणार असून, जे थकबाकीदार मालमत्ता कर भरणार नाहीत त्यांच्यावर जप्ती कार्यवाही करण्यात येणार आहे, यासाठी मालमत्ताधारकांनी जप्ती कार्यवाही टाळण्यासाठी मालमत्ता कर भरून सहकार्य करण्याचे आवाहन सिडको क्षेत्रीय कार्यालय सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी केले आहे.

सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जवळपास ३८२९ थकबाकी मालमत्ताधारकांना मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त अजितपाल संधू, सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या अधिपत्याखाली कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, वरिष्ठ लिपीक, मिना अडबलवार, मोहन लांडगे, कर निरीक्षक संजय नागापूरकर, वसंत कल्याणकर, नारायण आठवले, मारोती सारंग, लिपीक सादुला खॉन, मालू एनफळे, प्रकाश दर्शने, रमेश यशवंतकर, उत्तम जोंधळे, राहुल पाईकराव, दीपक जोंधळे, रविंद्र पोवळे यांच्यासह लिपीक यांनी मालमत्ताधारकांना नोटीस दिल्या. जे थकबाकीदार मालमत्ता कर भरणार नाहीत त्यांची मालमत्ता जप्त करण्यात येणार असल्याचे सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी सांगितले.

## घोषणांचा पाऊस, विकासाचा दुष्काळ

- खा. संजय राऊत यांची राज्य सरकारवर टीका
- मराठवाड्यासाठी ७८० घोषणा, प्रत्यक्ष काम केवळ १.५ टक्के; लेंडीचा खर्च ५२ कोटींवरून २२०० कोटींवर



**नांदेड (प्रतिनिधी)** – मराठवाड्याच्या विकासाच्या नावाने घोषणांचा पाऊस पाडायचा, भूमिपूजन करायचे आणि श्रेय लाटायचे, मात्र प्रत्यक्षात कामे रखडवायची, अशा शब्दांत खासदार संजय राऊत यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला.

शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) वतीने १ ते १७ सप्टेंबर दरम्यान ‘मराठवाड्याचा विकास, तुमसे ना हो पायेगा!’ या घोषवाक्याखाली जनआंदोलन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळी नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत खासदार संजय राऊत बोलत होते. यावेळी आमदार अंबादास दानवे, संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हाप्रमुख बबन बारसे, भुजंग पाटील, ज्योतिबा खराटे, महानगरप्रमुख प्रकाश मारावार आदी उपस्थित होते.

**७८० घोषणांचा हिशेब द्या**

राऊत म्हणाले, २०१६ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत मराठवाड्यासाठी ७८० निर्णय आणि घोषणा झाल्या, पण प्रत्यक्ष प्रगती केवळ १.५ टक्के आहे. नांदेडच्या विकासाची गॅरंटी (अशोकराव चव्हाण यांचे नाव न घेता) घेणाऱ्यांची गॅरंटी कोण घेणार?

लेंडी प्रकल्प १९८६ पासून रखडला असून, त्याचा खर्च ५२ कोटींवरून २२०० कोटींवर गेला आहे. जायकवाडी, बाभळी बंधारा, गोदावरी नदीकाठ विकास आणि जलवाहिनी प्रकल्पही केवळ कागदावरच असल्याचा आरोप त्यांनी केला. कागदावरील घोषणा शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आणू शकत नाहीत, असे ते म्हणाले.

**शेतकरी आणि युवकांचे प्रश्न**

खरीप हातातून गेल्याने शेतकरी संकटात असून हेक्टरी मदत आणि कर्जमाफी अनेकांपर्यंत पोहोचली नाही. ‘लाडकी बहीण’ योजनेवर टीका करताना ते म्हणाले, रोख रक्कम वाटण्याऐवजी महिलांना रोजगार आणि उद्योग द्या. MPSC परीक्षांमधील गैरप्रकारांवर केवळ SIT नेमून विद्यार्थ्यांचे भविष्य अडकवू नका. मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर सरकारने चर्चेचे दरवाजे बंद करणे ही क्रूरता असल्याचेही राऊत म्हणाले. १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत या आंदोलनाचा समारोप होणार आहे.

## नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकरी पुत्राची आत्महत्या

**लोहा (प्रतिनिधी)** – लोहा तालुक्यातील मौजे पिंपळगाव ढगे येथे दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७.३५ वाजता शेतकऱ्यांच्या बैलपोळा सणाच्या दिवशी शेतकरीपुत्र, कुटुंबकर्ता केरबा गोविंद डुबुकवाड वय ३५ वर्षे या शेतकरी पुत्राने सततच्या नापिकी, दुष्काळ व कर्जबाजारीपणाला कंटाळून राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्यामुळे पिंपळगाव ढगे येथे बैलपोळा सणावर दुःखाचे सावट पसरले.



याबाबत अधिक माहिती अशी की, लोहा तालुक्यातील मौजे पिंपळगाव ढगे येथे दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७.३५ वाजेच्या सुमारास केरबा गोविंद डुबुकवाड या शेतकरी पुत्राने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली व त्यांच्या खिशात सुसाईड नोट लिहुन ठेवली. सदरील सुसाईड नोटमध्ये असे नमूद केले की, कर्जबाजारी असल्यामुळे आत्महत्या करीत आहे.

याबाबत ग्राम महसूल अधिकारी किरण जाधव पिंपळगाव ढगे यांनी पंचनामा करून मयताच्या पत्नी व वडिलांचा जबाब नोंदवून घेतला. तसेच मयत शेतकरी पुत्र केरबा गोविंद डुबुकवाड यांच्या नावे शेती नाही. त्यांचे वडील गोविंद डुबुकवाड यांच्या नावे शेती आहे व ते एकत्रित कुटुंबात राहतात. आत्महत्याग्रस्त शेतकरी पुत्र केरबा गोविंद डुबुकवाड यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, आई-वडील, एक भाऊ असा परिवार आहे.

## शेख शमीम हत्या प्रकरण : मोक्कातील फरार आरोपीला अटक; १५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेख शमीम हत्या व मोक्का प्रकरणातील फरार आरोपी कलंदर बेग गफ्फार बेग (वय ४८, रा. खडकपुरा) याला पोलिसांनी अटक केली आहे. विशेष मोक्का न्यायाधीश तुषार आगलावे यांनी त्याला १५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

वजिराबाद पोलीस ठाण्यात BNS कलम १०३(१), ४९, ६१(२), ३(५), शस्त्र अधिनियम व मोक्का १९९९ चे कलम ३(१)(i), ३(२), ३(४) अन्वये गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात कलंदर बेग फरार होता. पोलिसांनी त्याला ९ सप्टेंबर रोजी रात्री ८.५२ वाजता अटक केली.

तपास अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांनी आरोपीला न्यायालयात हजर करून टोळीतील इतर सदस्यांचा शोध आणि सखोल तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली. विशेष सरकारी वकील ॲड. यादव तळेगावकर यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली.

युक्तिवाद ऐकून न्यायालयाने पोलीस कोठडी मंजूर केली. या गुन्ह्यात यापूर्वी मिर्झा शब्बर बेगसह १२ आरोपींना अटक झाली असून, पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने करत आहेत.

## पावसाच्या खंडाने सोयाबीन पिके वाळली; आ. कल्याणकरांकडून पाहणी

### तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याचे निर्देश; कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील तळणी परिसरात पावसाने दिलेल्या दीर्घ खंडामुळे वाळत चाललेल्या सोयाबीन पिकांची आ. बालाजीराव कल्याणकर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

दीड महिन्यापासून पावसाने मोठा खंड दिल्याने सोयाबीनसह खरीप पिकांना पाण्याचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून, परिस्थिती गंभीर बनली आहे. नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व



आवश्यक मदत द्यावी, असे निर्देश आ. कल्याणकर यांनी प्रशासनाला दिले. तसेच परिस्थिती पाहता कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली.

उभी पिके वाचविण्यासाठी सिद्धेश्वर व येलदरी धरणातून कालव्यांमध्ये तातडीने पाणी सोडण्याची मागणी यापूर्वीच जलसंपदा मंत्र्यांकडे करण्यात आल्याचे आ. कल्याणकर यांनी सांगितले. शेतकरी तसेच पशुधनाच्या पाण्याचा प्रश्नही तातडीने सोडवावा, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, नायब तहसीलदार दिग्गलवार, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच महसूल व कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## नांदेड शहरात हरित पट्टा निर्मितीसाठी ४०० वृक्षांची लागवड

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्रातील वाढती उष्णता आणि पाणी टंचाईच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी ‘निसर्ग आधारित उपाययोजना’ अंतर्गत नांदेड शहरात एका विशेष वृक्ष लागवड मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. महानगरपालिका, अखिल भारतीय आपत्ती निवारण संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आणि संस्कृती संवर्धन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी तरोडा भागातील कॅनॉल रोड येथे ४०० वृक्ष लागवडीचा कार्यक्रम ट्रि-गार्डसह यशस्वीपणे राबविण्यात आला.

या पर्यावरणपुरक उपक्रमाचे उद्घाटन नांदेड शहराच्या महापौर कविता मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रभागातील स्थानिक नगरसेवक सतीश देशमुख, नगरसेविका सुनिता जोंधळे, संतोष मुळे, महानगरपालिकेचे



उपायुक्त गंगाधर ईरलोड, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ. मिर्झा बेग, क्षेत्रिय अधिकारी नागनाथ पतंगे, रावण सोनसळे, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या संपूर्ण महाराष्ट्राला हवामान बदलामुळे वाढणारे तापमान आणि पाणी टंचाईच्या तीव्र समस्येचा सामना करावा लागत आहे. यावर दीर्घकालीन आणि प्रभावी उपाय म्हणून शहरांमध्ये ‘हरित पट्टा’ निर्माण करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. याच उद्देशाने तरोडा परिसरातील कॅनॉल रोड येथे ४०० विविध वनौषधी व सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आली. लावलेली झाडे सुरक्षित राहावीत, जनावरांपासून त्यांचे रक्षण व्हावे आणि त्यांचे योग्य संवर्धन व्हावे यासाठी प्रत्येक रोपट्याला ‘ट्रि गार्ड’ बसविण्यात आले आहेत.

कार्यक्रमात बोलताना महापौर कविता मुळे म्हणाल्या, पर्यावरणाचा समतोल राखणे आणि शहराचे तापमान नियंत्रित ठेवणे ही काळाची गरज आहे. केवळ वृक्ष लागवड करून चालणार नाही, तर त्यांचे जतन आणि संगोपन करणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. महानगरपालिका, जिल्हा प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असून, नागरिकांनीही आपल्या परिसरात जास्तीत जास्त झाडे लावून नांदेडला हरित व सुंदर बनवण्यासाठी सहकार्य करावे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखिल भारतीय आपत्ती निवारण संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आणि संस्कृती संवर्धन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कृषी आकृतीबंधावर शासनाकडून तोडगा न निघाल्याने लॅपटॉप केले परत



**नांदेड (प्रतिनिधी)** –मंजूर केलेला अतांत्रिक आकृतीबंध रद्द करून तज्ज्ञ समिती नेमणे बाबत महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघ यांचे विविध टप्प्यामध्ये आंदोलन सुरू आहे. दरम्यान शासनासोबत विविधस्तरावर बैठका होऊनही अद्यापपर्यंत कोणताही तोडगा निघाला नाही.

यापूर्वी कृषीमंत्री, कृषी सचिव, कृषी आयुक्त यांच्यासमवेत झालेल्या बैठकांचा सभा वृत्तांत महासंघाला लेखी मिळावा असा आग्रह धरीत कृषी सेवा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी आकृतीबंध रद्द करण्यासाठी पूर्व घोषित केलेले टप्पेनिहाय आंदोलन सुरूच ठेवण्यावर ठाम आहेत.

दरम्यान शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी अधिकाऱ्यांना शासनाने दिलेले लॅपटॉप वरिष्ठ अधिकाऱ्यांना राज्यभरात सर्वत्र पुन्हा परत करण्यात येत आहेत. आंदोलनाचा भाग म्हणून उपविभागीय कृषी अधिकारी नांदेड अंतर्गत तालुका नांदेड, अर्धापूर, मुदखेड, कंधार, लोहा या कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड दत्तकुमार कळसाईत, उपविभागीय कृषी अधिकारी नांदेड विशाल बिराडे यांच्याकडे लॅपटॉप परत केले असून, तथापि न्याय्य आंदोलनाची व्याप्ती महासंघांकडून वाढवली जात आहे.

मंजूर केलेला कृषी आकृतीबंध रद्द करण्याच्या मागणीसह तज्ज्ञांची समिती नेमण्याच्या मागणीवर महासंघ व अन्य संघटनेचे पदाधिकारी ठाम आहेत. शासनाने बोलावलेल्या कोणत्याही बैठकीस महासंघ व संबंधित संघटनाचे पदाधिकारी उपस्थित राहून चर्चेची दारे खुली ठेवत आहेत. मात्र १५ दिवसांपूर्वी संघटनेने धुडकावलेला प्रस्ताव पुन्हा पुन्हा समोर आणला जात असून, तो आम्हाला मान्य नाही अशी भूमिका घेत मंजूर आकृतीबंध रद्द करण्यावर आम्ही ठाम असल्याची माहिती महासंघाचे सहसचिव तथा सहायक कृषी अधिकारी संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष वसंत जारिकोटे यांनी दिली.

सदरील आंदोलनास नांदेड उपविभाग अंतर्गत महासंघाचे नांदेड कार्याध्यक्ष संजय चातरमल, उपाध्यक्ष डॉ. अमरज्योती गच्चे, सहायक कृषी अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शंकर पवार, उपकृषी अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजयानंद भोसले, तालुका कृषी अधिकारी लोहा प्रशांत कासराळे, तालुका कृषी अधिकारी कंधार सुनील राठोड, तंत्र अधिकारी सुप्रिया वायवळ, मंडळ कृषी अधिकारी सुनील सानप, सुनील देवकांबळे, गजानन पांडागळे, संभाजी वडजे, दत्ता भुते आदींसह महासंघाचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

**पान १ वरून...**

**डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या...**

आहेत. दोषींवर भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करून त्यांना १८ सप्टेंबरपर्यंत अटक करण्यात यावी अन्यथा १९ सप्टेंबर रोजी डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासमोर मातंग समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी भाजपचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, राजू लांडगे, सतीश बसवदे, शिवसेनेचे दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, दलित मित्र माधव आंबटवार, नारायण कोलंबीकर, उद्योजक माधव डोम्पले, अंकुश गायकवाड, सचिव पप्पू गायकवाड, दिगंबर नवघरे, शंकर गायकवाड, मरीबा बसवंते, केशव कांबळे, दया वाघमारे, सुरेश कांबळे, रिंकू सावळे, शंकर धीरडीकर, आनंदा गायकवाड, चंदू कांबळे, अशोक कांबळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, समाजबांधव, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मनपाच्या प्रभाग क्रमांक २० च्या लोकप्रतिनिधी मंगला गजानन देशमुख, सुवर्णा सतीश बसवदे, निरंजना राजू लांडगे, संजय पाटील घोगरे व वैजनाथ देशमुख यांनी मनपा आयुक्तांना निवेदन देऊन सिडको-हडको परिसरातील पुतळ्याजवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी केली. तसेच, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, जिल्हाधिकारी व ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना समाजबांधवांच्या वतीने निवेदने देण्यात आले. बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकरी व शेतमजूर यांना तत्काळ मदतीची मागणी

## जवळगावकरांच्या नेतृत्त्वात तहसीलवर धडक मोर्चा

**हदगाव (प्रतिनिधी)** – निसर्गाच्या लहरीपणामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतीचा प्रश्न ऐरणीवर घेत आज हदगाव शहरात शेतकरी व शेतमजुरांचा एल्गार पाहायला मिळाला. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी, शेतकऱ्यांनी हातात तिरंगी झेंडे घेत शहरातील मुख्य रस्त्यांवरून जोरदार निदर्शने केली.

मागील काही दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामातील पिके करपून गेली असून, बळीराजा पुरता हतबल झाला आहे. या पार्श्वभूमीवर हा मोर्चा काढण्यात आला. घोषणाबाजी करत शहर पिंजून काढल्यानंतर आंदोलक तहसील कार्यालयाच्या पायरीवर धडकले. यावेळी मोठा जनसमुदाय जमल्याने परिसरात काहीकाळ तणावाचे



वातावरण होते. तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना उद्देशून एक निवेदन सुपूर्द करण्यात आले. यामध्ये तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, एकरी ५० हजार रुपयांची तत्काळ मदत मिळावी, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी व्हावी, नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशा प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय शेतीपंपांना बारा तास वीज, मनरेगातून मजुरांच्या हाताला काम, पीकविम्याची तत्काळ आगाऊ रक्कम, मजुरांना ५० किलो धान्य, जनावरांसाठी चारा छावण्या, वादग्रस्त शक्तिपीठ महामार्ग रद्द करणे आणि ई-पीक पाहणीचे जाचक निकष शिथिल करणे यांचाही आग्रह धरण्यात आला.

यावेळी बोलताना माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी शासन शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप केला. शेतकरी उद्ध्वस्त झाला असताना सरकार डोळ्यावर पट्टी बांधून बसले आहे. आमच्या मागण्या तत्काळ मान्य न झाल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. मोर्चात तालुकाध्यक्ष किशोर पाटील कदम, नगरसेवक अमित अडसूळ, नगरसेवक अजय सूर्यवंशी, नगरसेवक शेख कलीम, नगरसेवक प्रतिनिधी फिरोज पठाण, नगरसेवक संदीप शिंदे, आनंदराव मस्के, संदीप काळबांडे, श्याम पाटील, यशवंत प्रधान यांच्यासह परिसरातील शेकडो शेतकरी, शेतमजूर व काँग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करून १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com